प्रकरण सातवे

डांग जिल्ह्यातील बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास

७. १. प्रस्तावना
७. २. डांगी बोलीचा भू-प्रदेश
७. ३. डांगी बोली नेमकी कोणाची?
७. ४. डांगी, कोकणी की भिल्ली?
    ७. ४. १. विविध अभ्यासकांचे मत
    ७. ४. २. 'कोकणी' आणि 'भिल्ली' हे जातीवाचक शब्द
    ७. ४. ३. 'डांगी' हा प्रदेशवाचक शब्द
७. ५. डांगी बोलीवर अन्य भाषा आणि बोलींचा प्रभाव
    ७. ५. १. डांगी बोलीवर मराठी भाषेचा प्रभाव
    ७. ५. २. डांगी बोलीवर गुजराती भाषेचा प्रभाव
    ७. ५. ३. डांगी बोलीवर अहिराणी बोलीचा प्रभाव
७. ६. भाषा संपर्काची कारणे
    ७. ६. १. बाजारहाट
    ७. ६. २. रोटी-बेटी व्यवहार
    ७. ६. ३. शैक्षणिक भाषा
    ७. ६. ४. रोजगारासाठी मजुरांचे स्थलांतर
    ७. ६. ५. धर्मांतर
    ७. ६. ६. इंग्रजी राजवट
    ७. ६. ७. धार्मिक स्थळे
    ७. ६. ८. पर्यटन स्थळे
    ७. ६. ९. संपर्क साधने
७. ७. अन्य भाषेतून डांगी बोलीत आलेले शब्द
७. ८. उच्चार प्रक्रिया/स्वन परिवर्तन
७. ९. डांगी बोलीचा शब्दसंग्रह
७. १०. डांगी बोलीची खास वैशिष्ट्ये
७. ११. समारोप
संदर्भ:

प्रकरण सातवे

डांग जिल्ह्यातील बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास

---

७. १. प्रस्तावना:

डांगी बोली तसे पाहता मराठी भाषेला खूप जवळची आहे. तसेच ती गुजराती भाषेलाही जवळची आहे हे नाकारता येत नाही. ग्रिअर्सनला ती मराठी किंवा गुजराती भाषेपेक्षा खानदेशीला (अहिराणीला) जवळची वाटली. आणि तसे त्याने आपल्या 'Linguistic Survey of India' च्या नवव्या खंडातील तिसऱ्या भागात लिहूनही ठेवले आहे. मात्र ग्रिअर्सनने लिहून चार ते पाच दशकांचा काळ लोटल्यानंतर जेव्हा भाषावार प्रांतरचनेची गरज भासायला लागली तेव्हा कुठे मराठी आणि गुजराती अभ्यासक खडबडून जागे झाले आणि जो तो म्हणायला लागला की, 'डांगी बोली ही आमची आहे.' जर खरोखर डांगी बोली तुमची होती आणि तिच्याबद्दल तुम्हाला एवढी आपुलकी होती तर चार ते पाच दशकं तुम्ही डांगी बोलीसाठी काय केले? हा प्रश्न उपस्थित झाल्यावाचून राहात नाही. शिवाय हा प्रश्न नुसता डांगी बोलीविषयीच उपस्थित होतो असे नाही, तर तो अहिराणी किंवा कोकणीसारख्या किंवा असमिया, खासी, गारो, बांग्लासारख्या अनेक सीमावर्ती भागातील आदिवासींच्या, मागासलेल्यांच्या, जनसामान्यांच्या बोलींच्या बाबतीत उपस्थित होतो. आजही काही सीमावर्ती भागातील बोलींचा प्रश्न ऐरणीवर टांगलेला आहे. त्यासाठी जनसामान्य आदिवासी संघर्ष करतांना दिसत आहेत. मात्र डांगी बोलीविषयी तशी तळमळ, तसा संघर्ष आजतरी दिसत नाही.

जो थोडा संघर्ष स्वातंत्र्यानंतर मराठी आणि गुजराती भाषिकांमध्ये झाला त्याचा यथायोग्य परामर्श प्रस्तुत प्रकरणामध्ये घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्या अर्थी या संघर्षाची ठिणगी ग्रिअर्सनने पेटविली त्या अर्थी त्याच्यापासून प्रस्तुत प्रकरणाची सुरुवात करून आताच्या नवीन अभ्यासकांपर्यंत सखोल चर्चा केली आहे. या दरम्यान कोणकोणत्या घडामोडी घडल्या? त्याचे परिणाम काय झाले? कोणी किती आणि कसे प्रयत्न केले? कोण कुठे कमी पडले? आणि आताची एकूण परिस्थिती काय आहे? भविष्यात काय होईल? या सगळ्या प्रश्नांची उकल प्रस्तुत प्रकरणातून करण्याचा प्रयत्न केला आहे. यातून डांगी बोलीवर चांगला प्रकाश पडेल असे मला वाटते.

७. २. डांगी बोलीचा भू-प्रदेश:

डांगी बोलीच्या भू-प्रदेशाचा विचार करता डांग हा संपूर्ण जिल्हाच डांगी बोलीच्या क्षेत्राखाली येतो. डांगी बोलीच्या मध्यवर्ती स्थानाचा विचार करता गाडवी प्रदेश महत्त्वाचा मानला जातो. कारण गाडवी गावाच्या आसपासची जी डांगी बोली आहे ती मध्यवर्ती बोली आहे असे अभ्यासकांचे मत आहे. डांग प्रदेशावर भिल्ल राजांची सत्ता इंग्रज काळातही कमी अधिक प्रमाणात टिकून होती. या राजांमध्ये गाडवीचा राजा सर्वश्रेष्ठ मानला जात होता. याच कारणाने अभ्यासकांचे लक्ष या प्रदेशाकडे

अधिक आकृष्ट झाले असावे. राजाचे श्रेष्ठत्व येथील बोलीलाही प्रदान केले गेलेले दिसते. जसे मराठ्यांच्या राज्याचे केंद्रस्थान पुणे असल्यामुळे तेथील बोली किंवा भाषा ही मराठीची मध्यवर्ती भाषा म्हणून ओळखली जाते.

डांग जिल्ह्याच्या सीमा निश्चित असल्या तरी १ मे १९६० पूर्वी म्हणजेच गुजरात आणि महाराष्ट्राची विभागणी होण्यापूर्वी डांगच्या सीमा खूप विस्तारित होत्या. त्यात सध्याच्या नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील काही भाग, नवसारी जिल्ह्यातील वासदा तालुक्यातील काही भागतसेच वलसाड जिल्ह्यातील धरमपूर तालुक्यातील काही भाग हा डांगमध्ये मोडत होता. कारण त्या त्या प्रदेशात डांगी बोली बोलली जात होती आणि अजूनही बोलली जात आहे. परंतु प्रशासनाच्या सोयीसाठी १ मे १९६० पासून डांग जिल्ह्याच्या सीमा निश्चित झाल्या आणि सुरगाणा, वासदा, धरमपूरसारखे प्रदेश डांगपासून तुटले गेले. त्याचबरोबर त्यांची डांगी बोलीही तुटली गेली. असे असले तरी डांगी बोलीच्या भू-प्रदेशाचा विचार करता आपल्याला संपूर्ण डांग जिल्हा आणि त्याच्या आजूबाजूचा डांगी बोलीने प्रभावित असलेला भू-प्रदेश विचारात घ्यावा लागतो.

७. ३. डांगी बोली नेमकी कोणाची?

- **जॉर्ज ग्रिअर्सन (१८५१-१९४१):** ग्रिअर्सनने हैदराबाद, मद्रास वगैरे काही संस्थानांचा भाग सोडला तर संपूर्ण भारतीय (आताचा पाकिस्तान, बांगलादेश आणि म्यानमार यांचाही यात समावेश होतो.) बोलीभाषांचा एकत्रितपणे अभ्यास केला आहे. ग्रिअर्सन हा डांगी बोलीबरोबर भारतीय बोलींचा अभ्यास करणारा पहिला आणि महत्त्वाचा अभ्यासक. हा एक वरिष्ठ इंग्रज अधिकारी असल्याने त्याने विविध प्रांतातील अधिकाऱ्यांकडून तेथील स्थानिक बोलींचे नमुने मागवून घेतले आणि त्यानुसार अभ्यास करून आपले मत मांडले आहे. हा एक सर्वसमावेशक असा बोलींचा अभ्यास असल्याने त्याचे काही निष्कर्ष नंतरच्या काळात चुकीचे ठरलेले आहेत. असे असले तरी अभ्यासाचा आवाका लक्षात घेता त्याचे हे कार्य अतुलनीय असेच आहे. त्यांनी १८९८ ते १९२८ अशा तीस वर्षांत हे कार्य केले आहे. ग्रिअर्सनने १९०७ साली त्यांच्या 'Linguistic Survey of India' च्या नवव्या खंडातील तिसरा भाग प्रसिद्ध करून त्यात त्यांनी डांगी बोली ही खानदेशीला जवळ जाणारी बोली ठरवून खानदेशी बोली ही गुजरातीची बोली म्हणून समावेश केला आहे. १८९१ साली डांगच्या ३२,९०० लोकांपैकी ३१,७०० लोकांनी त्यांची भाषा डांगी असल्याचे म्हटले आहे, अशी नोंद ग्रिअर्सन करतात. हे प्रमाण ९६.३५% इतके आहे.

पुढे ते म्हणतात, "The so-called Dangi is almost identical with the current language of Khandesh."[१](LSI, Vol.IX –Part III, P-224) म्हणजेच, 'तथाकथित डांगी खानदेशच्या सध्याच्या भाषेशी जवळजवळ सारखीच आहे' असे म्हटले आहे. एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ग्रिअर्सनने त्यांच्या Linguistic Survey of Indiaच्या अकरा खंडांपैकी फक्त नवव्या खंडाच्या तिसऱ्या भागात पृष्ठ क्रमांक २२४ ते २२८ मध्ये डांगी बोलीविषयी उल्लेख केला आहे. त्यातील २२४ वर आणि तेही अर्ध्या पृष्ठावर फक्त ग्रिअर्सनने डांगीविषयी स्वतःचे मत मांडले आहे. २२४ आणि २२५ वर देवनागरी लिपीत डांगी बोलीतील एक उतारा दिला आहे. पुढे

पृष्ठ २२६ ते २२८ वर डांगी बोलीतील उताऱ्याचे इंग्रजी भाषेत भाषांतर केलेले आहे. थोडक्यात काय? तर डांगी बोलीविषयी ग्रिअर्सनने फक्त साडेचार पृष्ठांत अभ्यास केला आहे. त्यातही स्वतःचे मत फक्त अर्ध्या पृष्ठावर मांडले आहे. या अर्ध्या पृष्ठावर डांगी ही गुजरातीची बोली आहे असे ग्रिअर्सनने थेटपणे म्हटलेले नाही. परंतु खानदेशी ही गुजराती आणि राजस्थानी मिश्रित बोली असून डांगी खानदेशीच्या जवळ जाणारी बोली आहे असे म्हटले आहे. यावरून डांगी – खानदेशी – गुजराती + राजस्थानी असा विचार ग्रिअर्सनने केलेला दिसतो. यातूनच "डांगी बोली नेमकी कोणाची?" हा वाद सुरु झाला असे म्हणता येते. नंतर या वादातून अनेक मराठी-गुजराती अभ्यासकांनी अभ्यास केला, समित्या नेमल्या, अहवाल सादर केले.

- **गुजरात साहित्य सभेचा अहवाल (२० जून १९४९):** ग्रिअर्सनने डांगी बोलीविषयी केलेल्या अभ्यासाला चाळीस वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतर गुजरात साहित्य सभेचा अहवाल सादर झालेला दिसतो. या अहवालात गुजराती अभ्यासकांनी डांगी बोलीचा अभ्यास केला तो 'डांगी ही गुजरातीची बोली आहे' हा दृष्टीकोन समोर ठेवून. या अहवालातील एक उतारा जसाच्या तसा खाली देत आहे.

"समिति अहवा थी आगळ नथी शको न हतो. कारण के चोमासाना कारणे रस्ताओ बंध करवामां आव्या हतां. परंतु समग्र डांगनो ख्याल आवो अने ते रीते त्यांना माणसोनो संपर्क साध्यो हतो अने तपास करी हतां."

वरील उताऱ्यात गुजरात साहित्य सभेने म्हटले आहे की, "समिती आहव्यापासून पुढे जाऊ शकली नाही. कारण की पावसाळ्याच्या कारणाने रस्ते बंद करण्यात आले होते. परंतु समग्र डांगचे आकलन होईल त्या पद्धतीने तेथील माणसांशी संपर्क करून चौकशी केली होती."[१]या उताऱ्यात समिती आहव्याच्या पुढे गेली नाही असे स्पष्टपणे म्हटले आहे. म्हणजेच ही समिती वघई मार्गे आहव्याला गेली आणि तेथूनच सगळा लेखाजोखा तयार करून पुढे अहवाल सादर केला. वघई ते आहवा हे अंतर जेमतेम तीस किलोमीटरचे आहे. हा तीस किलोमीटरचा प्रवास करून संबंध डांग जिल्ह्याचा अहवाल तयार केला. शिवाय वघई परिसर गुजरात सीमेला जवळ आहे. मात्र आहव्यापासून पुढे पूर्वेला किंवा दक्षिणेला गेले असता मराठी भाषिकांचा प्रदेश सुरु होतो. आणि तोच प्रदेश नेमका गुजरात साहित्य सभेने टाळला होता. त्यामुळे त्यांच्या अहवालात डांगी बोली ही गुजरातीची बोली आहे असे म्हटले जाने साहजिकच होते. हीच गत मराठीच्या बाजूने डांगी बोलीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांचीही झाली होती.

- **रा. श्री. जोग:** मराठीच्या बाजूने डांगी बोलीचा अभ्यास रा. श्री. जोग यांनी केला आहे. रा. श्री. जोगांनी १९५० साली मराठी साहित्य परिषद-पुणे यांच्या वतीने आणि परिषदेचे अध्यक्ष या नात्याने

डांगी बोलीवर एक विस्तृत लेख लिहिला. हा लेख त्यांनी गुजरात साहित्य सभेच्या अहवालाच्या एक वर्ष नंतर लिहिला. त्यामुळे त्यात त्यांनी ग्रिअर्सनचे आणि गुजरात साहित्य सभेचे मत खोडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी आणि संस्कृतचे प्राध्यापक असल्याने त्यांनी भाषिकदृष्ट्या आणि व्याकरणीकदृष्ट्या डांगी बोलीचा विचार केलेला आहे. डांगी बोलीचे शब्द तपासून त्याचे मराठी आणि गुजराती भाषेतील प्रमाण दाखवून दिले आहे.

नंतरच्या काळात दादासाहेब बिडकर, नानासाहेब दीक्षित इत्यादींनी 'डांग सेवा मंडळ' स्थापन करून डांगमध्ये अनेक कार्ये केली. परंतु ते भाषिकदृष्ट्या प्रांतरचनेच्या वेळी अपयशी ठरले. शिवाय याचदरम्यान दादासाहेब बिडकर आणि नानासाहेव दीक्षित यांच्यात न्यायालयात जाण्यापर्यंतचा टोकाचा वाद झाला होता असे त्यांच्या इतिहासावरून दिसते.

खरे तर "डांगी बोली नेमकी कोणाची?" हा वाद स्वातंत्र्यापुर्वीच उद्भवायला हवा होता. परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही. ग्रिअर्सनने हा वाद १९०७ साली लिखित स्वरुपात निर्माण केला. परंतु त्यावेळी या वादाकडे कोणाचे लक्ष गेले नाही. आणि तशी गरजही नव्हती. मात्र भारत स्वतंत्र झाला आणि भाषावार प्रांतरचना निर्माण व्हायला लागली तेव्हा जो तो खडबडून जागा झाला असे म्हणावे लागते. त्याआधी मात्र कोणती बोली कुठे का असेना कोणाला विशेष देणेघेणे नव्हते. तेच डांगीच्या बाबतीतही झाले.

एक गोष्ट अशीही लक्षात येते की, खरा वाद हा डांगी बोलीचा नव्हता तर तो खानदेशीचा होता. कारण, खानदेशीविषयी जेवढी आपुलकी मराठी माणसाने दाखवली तेवढी डांगी बोलीविषयी दाखवली नाही. किंवा जेवढे मराठी अभ्यासक, संशोधक खानदेशीला लाभले तेवढे अभ्यासक डांगी बोलीला लाभले नाहीत. या उदासीनतेचे एक कारण असेही सांगता येते की, ग्रिअर्सनने डांगी ही खानदेशीला जवळ जाणारी बोली आहे असे म्हटले होते. (डांगी ही गुजरातीची बोली आहे असे थेटपणे ग्रिअर्सनने म्हटलेले नाही.) त्यामुळे नंतरच्या काळातील मराठी अभ्यासक, संशोधकांना असे वाटले असेल की खानदेशीला आपल्याकडे ओढले की आपोआपच डांगी बोलीही आपल्याकडे ओढली जाईल. परंतु दुर्दैवाने त्यांचा हा विचार पूर्णत्वास गेला नाही. खानदेशी जरी आज महाराष्ट्राची बोली असली तरी डांगी बोलीला ते आपलीशी करू शकले नाहीत ही सत्य घटना आहे. याचा परिणाम म्हणून डांगी बोली मराठीशी कितीही मिळतीजुळती असली तरी ती आज बदलायला लागली आहे. तिच्यावर असलेली मराठीची पकड हळूहळू सुटायला लागली आहे. तिचे शैक्षणिकदृष्ट्या गुजरातीकरण हळूहळू होतांना दिसत आहे.

७. ४. डांगी, कोकणी की भिल्ली?:

हल्ली डांगी, कोकणी आणि भिल्ली हे तीन शब्द डांगमध्ये आणि डांगच्या आसपास बोलल्या जाणाऱ्या बोलीविषयी वापरले जातात असे दिसते. 'डांगी बोली नेमकी कोणाची?' हा वाद जसा एकेकाळी राष्ट्रीय पातळीवर गाजला तसाच काहीसा आज डांगअंतर्गत येणाऱ्या अभ्यासकांमध्ये 'डांगी, कोकणी की भिल्ली?' हा वाद निर्माण होतांना दिसत आहे.

डांगी बोलीचा प्रदेश हा संपूर्ण डांग आणि डांगच्या बाहेरही पसरलेला आहे. या बोलीच्या सीमा नवसारी, सुरत, वलसाड आणि तापी या गुजरातमधील चार जिल्ह्यांत पसरलेल्या आहेत. तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे आणि नाशिक जिल्ह्यात पसरलेल्या आहेत. डांगी बोलीची ही सीमा खूप मोठी असल्याने अभ्यासकांची या बोलीविषयी वेगवेगळी मते पाहायला मिळतात. काही अभ्यासक डांग जिल्ह्याच्या बाहेरचे रहिवासी असल्याने असे होणे साहजिकच आहे. परंतु काही अभ्यासक हे मुळचे डांग जिल्ह्यातील आहेत. तरीही त्यांच्या अभ्यासात एकवाक्यता दिसतनाही. दुसरे असे की, आतापर्यंत भाषाशास्त्रीयदृष्ट्या कोणीही डांगी बोलीविषयी सखोल असा अभ्यास केलेला नाही. जो तुरळक केला आहे; तो लोकसाहित्याच्या अंगाने केला आहे. लोकसाहित्याचा अभ्यास करतांना प्रबंधातील किंवा पुस्तकातील एखादे प्रकरण डांगी बोलीविषयी आढळते. किंवा डांग जिल्ह्याचा परिचय करून देतांना सुरुवातीला एखाद दुसरे पान डांगी बोलीविषयी लिहिलेले पाहायला मिळते. त्यामुळे डांगी बोलीविषयी त्यातून सखोल चिंतन मनन झालेले दिसत नाही. तरीही डांगी बोलीचा अभ्यास करतांना आपल्याला त्यांच्या अभ्यासाचा, विचारांचा, संशोधनाचा आढावा घेणे गरजेचे आहे. यादृष्टीने आपण एकेका अभ्यासकांची मते जाणून घेऊ.

७. ४. १. विविध अभ्यासकांची मते:

- **डॉ. सु. बा. कुलकर्णी:** डॉ. सु. बा. कुलकर्णी हे बोलींचे अभ्यासक असून त्यांनी पोवारी बोली, कोकणातील कातकरी बोली तसेच डांगी किंवा भिल्ली बोलीचा चांगला अभ्यास केलेला आहे. डांगी बोलीच्या दृष्टीने त्यांचे मत विचारात घेणे मला गरजेचे वाटते. त्यांनी १९७६ साली पुणे विद्यापीठांतर्गत "Bhilli of Dangs."नावाचा प्रबंध लिहिला आहे. तसेच "भाषा व साहित्य: संशोधन-खंड पहिला" या डॉ. वसंत स. जोशी संपादित ग्रंथात एक विस्तृत लेख लिहिला आहे. या लेखात त्यांनी काही डांगी बोलीविषयी आपली मते मांडली आहेत. ती अशी, १. "भाषावार प्रांतरचनेच्या धामधुमीत डांगची बोली मराठी की गुजराती हे नीटसे समजण्यापूर्वीच डांग गुजराथेत गेला."[३] २. "डांग या भौगोलिक प्रदेशात बोलली जाणारी बोली ती डांगी या संभ्रमाखाली कोकणे, वारली व भिल्ल अशा तीन समाजाच्या संरचनेने भिन्न असलेल्या बोलींचे साहित्य एकत्रित करून त्याचे विश्लेषण केले गेले आहे व ते मराठीच्या पीएच. डी. साठी मान्यही झालेले आहे!"[४] ३. "ग्रियर्सनचे कोकणी, खानदेशी, डांगी, हळबी इ. बोलींसंबंधी निष्कर्ष विवाद्य ठरल्याने बोलींच्या शास्त्रीय अभ्यासाची गरज तीव्रतेने भासू लागली. भाषावार राज्यनिर्मितीच्या झंझावातात भाषिक कारणांपेक्षा राजकीय कारणांनीच डांग गुजरातेत समाविष्ट झाला."[५] उपरोक्त पहिल्या आणि तिसऱ्या मतामध्ये डांग गुजरातमध्ये समाविष्ट करण्यास कुठेतरी घाई केल्याचे दुःख सु. बा. कुलकर्णी यांच्या मनामध्ये आहे. शिवाय यासाठी ते राजकीय यंत्रणेला जबाबदार धरतात असे दिसते. दुसरे मत येथे अतिशय महत्त्वाचे असून त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले आहे की, कोकणे (कोकणा, कोकणी, कुणबी इ.), वारली आणि भिल्ल हे स्वतंत्र समाज (जमाती) असून त्यांच्या स्वतंत्र बोली आहेत. दुसरा सूर असा आहे की, या तीनही समाजाच्या साहित्याचे एकत्रीकरण होऊ नये. तर त्यांचे स्वतंत्र अभ्यास व्हावेत. यावरून असे सांगता

येते की, डॉ. सु. बा. कुलकर्णी हे कोकणी, वारली, डांगी व भिल्ली या वेगवेगळ्या व स्वतंत्र बोली आहेत असे मानतात. परंतु डांगी बोलीविषयी येथे विशेष माहिती मिळत नाही.

- **डाह्याभाई वाढू:** डाह्याभाई वाढू हे कुंकणा समाजाचे अभ्यासक म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांनी कुंकणांच्या लोककथांचे संकलन करून त्यांचा सखोल अभ्यास केला आहे. ते भाषा संशोधन-प्रकाशन केंद्र, वडोदरा येथून निघणाऱ्या 'ढोल' नियतकालिकाचे सहसंपादक होते. त्यावेळी त्यांनी कुंकणा बोलीविषयी व साहित्याविषयी आपले मत व्यक्त केले आहे. तसेच 'कुंकणा कथाओ' या त्यांच्या गुजराती पुस्तकात 'कुंकणा समाज अने भाषा' या शीर्षकाखाली त्यांनी कोकणी बोलीविषयी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, "कुंकणा जी भाषा बोलतात त्या भाषेला कुंकणा भाषा म्हणतात. डांग जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या कुंकणा भाषेला 'डांगी' नावाने ओळखले जाते. परंतु 'डांगी' भाषा कुंकणांव्यतिरिक्त अन्य लोकंही बोलतात. त्यावरून 'डांगी' मात्र कुंकणा भाषा न राहता बोलींचे मिश्रण बनली आहे. डांगमध्ये वघई, गाढवी, जामलापाडा वगैरे प्रदेशात शुद्ध स्वरुपाची कुंकणा-डांगी बोलली जाते. पण पीपलदहाड, चींचली, मोरझीरा वगैरे प्रदेशातील भाषेवर ग्रामीण मराठीचे प्रभुत्व आहे. त्याचप्रमाणे सापुतारा, मालेगांव वगैरे प्रदेशातील भाषेवर मराठीचे प्रभुत्व आहे. महाराष्ट्र राज्याच्या सीमेला जोडलेल्या सगळ्या प्रदेशातील भाषेवर मराठीचे प्रभुत्व आहे."[६] येथे कोकणांची (कुंकणा, कोकणी, कुणबी इ.) ती कोकणी बोली असे डाह्याभाई वाढू म्हणतात. पुढे डांग जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेला (बोलीला) डांगी नावाने ओळखले जाते असेही म्हणतात. परंतु डांगमध्ये बोलली जाणारी डांगी नुसते कोकणा बोलतात असेही नाही. त्यामुळे पुढे ते सूचकपणे बोलतात, डांगी ही बोलींचे मिश्रण आहे. पण येथे कोणकोणत्या बोलींचे मिश्रण आहे हे मात्र स्पष्ट करत नाहीत. पुढे अजून एक वाक्य देतात, डांगमध्ये वघई, गाढवी, जामलापाडा वगैरे प्रदेशात जी बोली बोलली जाते ती शुद्ध स्वरुपाची कुंकणा-डांगी आहे. कुंकणा आणि डांगी या शब्दांमध्ये जरी त्यांनी संयोग चिन्ह (-) वापरलेले असले तरी ते कुठेना कुठे डांगी बोली आणि कोकणी बोली यांच्या संदर्भात संभ्रमित आहेत असे वाटते.
- **डॉ. पुंडलिक पवार:** डॉ. पुंडलिक पवार हे मुळचे लोकसाहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांनी गुजरातीमधून 'डांगी लोककथाओ' (२००६), डांगी लोकगीतो' (२००६), डांगी कहेवतो' (२००६) अशी डांगी लोकसाहित्यासंदर्भात काही पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. यातील प्रत्येक पुस्तकात त्यांनी 'डांगी बोली' असे लिहून पुढे कंसात 'कोकणी भाषा'[७] असे लिहिले आहे. यावरून त्यांना डांगी बोलीलाच कोकणी बोली म्हणावयाचे आहे असे दिसते. कारण जेथे जेथे 'डांगी बोली' असे शब्द आलेले आहेत तेथे तेथे त्यांनी कंसात 'कोकणी भाषा' असे शब्द वापरलेले आहेत. त्याशिवाय त्यांनी कुठेही डांगी बोली आणि कोकणी बोली किंवा भाषा यांमध्ये तफावत असल्याचे म्हटलेले नाही. कदाचित त्यांची दृष्टी फक्त कथागीतांकडेच असल्याने असे झाले असेल.
- **डॉ. प्रभुभाई चौधरी:**डॉ. प्रभुभाई चौधरी हे लोकसाहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांनी गुजराती विषयातून डांगी लोकसाहित्याविषयी पीएच. डी.चा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासातून त्यांनी

'दस डांगी लोककथाओ (२०१०)', 'डांगी लग्नगीतो: एक अभ्यास (२०१२)' या गुजराती पुस्तकांचे प्रकाशन केले आहे. त्यात त्यांनी डांग जिल्ह्याचा सामान्य परिचय करून देतांना डांगी बोलीविषयी थोडे विवेचन केले आहे. ते म्हणतात, "सामान्यतः डांगी बोलीचे स्वर आणि व्यंजन गुजराती आणि मराठी आहेत. डांगी बोलीचे शब्द खानदेशी बोलीहून थोडे वेगळे आहेत. डांगी बोलीचे स्वतःचे कितीतरी शब्द आहेत, जे भिल्ली बोलीच्या शब्दांशी मिळते जुळते आहेत. डांगी बोलीचा शब्दसमूह खूप विशाल नाही कारण डांगी बोलीचा अजूनही फारसा विकास झालेला नाही. या विकास प्रक्रियेत डांगी बोली आवश्यकतेनुसार मराठी आणि गुजराती भाषेतील शब्द उचलून घेत आहे. डांगी बोलीमध्येही भिल्ल, कुंकणा आणि वारलींचे शब्द – उच्चारण पद्धती, लय वेगवेगळी आहे."[८] या विवेचनावरून प्रभुभाईला डांगी बोली ही खानदेशीहून वेगळी आहे तसेच मराठी आणि गुजरातीचा तिच्यावर प्रभाव आहे आणि भिल्ली बोलीला जवळ आहे असे म्हणावयाचे आहे असे दिसते. त्यातच त्यांना डांगी बोलीमध्ये भिल्ल, कुंकणा आणि वारलींचे शब्द, उच्चारण पद्धती, लय मान्य आहे. तरीही ते डांगी बोलीला भिल्ली बोली किंवा कोकणी बोली असे न म्हणता 'डांगी बोली'च म्हणतात.

- **डॉ. अमृत कुंवर:** डॉ. अमृत कुंवर हेही लोकसाहित्याचे अभ्यासक आहेत. परंतु त्यांनी डांगी बोलीविषयीही चांगले काम केल्याचे दिसते. त्यांनी पीएच. डी. पदवीसाठी 'गुजराती भाषा आणि डांगी बोलीची तुलना' (२००५) हा विषयी घेऊन डांगी बोलीची साधक बाधक चर्चा केल्याचे दिसते. यात त्यांनी डांगी बोलीचे ध्वनिस्वरूप, रुपतंत्र, व्याकरणिक स्वरूप, लाक्षणिकता, डांगी बोलीचा शब्दसंग्रह इत्यादी मुद्द्यांना धरून डांगी बोलीची गुजराती भाषेशी तुलना करण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. या त्यांच्या प्रबंधावर गुजराती भाषाभ्यासक डॉ. योगेंद्र व्यास (गुजराती भाषानुं व्याकरण) यांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. तरीही भाषाभ्यासाच्या दृष्टीने डांगी बोलीवर त्यांनी चांगला प्रकाश टाकला आहे. हा आतापर्यंतचा डांगी बोलीवर स्वतंत्र आणि महत्त्वाचा अभ्यास असला तरीही या प्रबंधाचे अद्यापही प्रकाशन झालेले नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

डॉ. अमृत कुंवर हे डांगी बोली, भिल्ली बोली आणि कोकणी बोली यांत भेदभाव असल्याचे नमूद करतात. त्यांच्या मते भिल्ली बोली ही गुजरातच्या पूर्व पट्टीपासून महाराष्ट्रातील खानदेशपर्यंत राहणारे जे भिल्ल लोक आहेत त्यांच्याकडून बोलली जाते.यात डांग जिल्ह्याचाही समावेश होतो. कोकणी बोली ही धरमपूर, ठाणे जिल्ह्याचा उत्तर भाग, दमन, दादरानगर हवेली या परिसरात जी कोकणांकडून बोलली जाते ती कोकणी. या बोलीत महाप्राणांची संख्या जास्त असल्याचेही ते म्हणतात. मात्र डांगी बोली त्याहून वेगळी आहे असे ते म्हणतात. डांगी बोली ही प्रामुख्याने डांग जिल्ह्यात बोलली जाते. मात्र तिच्या अस्सलपणाची जाणीव वघई ते सामगहाण या डांगच्या नैऋत्य भागात होते असे ते म्हणतात. त्यांच्या 'आदिवासी उत्सवो-लोकनृत्यो-लोकगीतोनो दृश्य-श्राव्य अभ्यास' (२०१४), 'डांगी लोकनृत्योनी परंपरा' (२०२०) या पुस्तकातही डांगी बोलीला अन्य कोकणी किंवा भिल्ली बोली असे म्हटलेले दिसत नाही.

७. ४. २. 'कोकणी' आणि 'भिल्ली' हे जातीवाचक शब्द:

कोकणा, कोकणी, कुणबी, कुंकणा अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या जमातीकडून जी बोली बोलली जाते तिला आपण साधारणतः कोकणी बोली असे म्हणतो. या कोकणांची वस्ती ठाणे, नाशिक, धुळे आणि नंदुरबार या महाराष्ट्रातील जिल्ह्यांत आणि सुरत, नवसारी, तापी, वलसाड आणि डांग या गुजरात राज्यातील जिल्ह्यांत तसेच दादरा नगर हवेली आणि दमण या केंद्रशासित प्रदेशात आढळून येते. यावरून पाहता आज कोकणा जमात मोठ्या प्रदेशावर पसरलेली, विखुरलेली आहे हे लक्षात येते. या कोकणांचे मूळ स्थान हे महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीतील म्हणजेच कोकणातील आहे असे मानण्यात येते. "मौखिक परंपरेनुसार १३९६ ते १४०८ दरम्यान कोकणाला उध्वस्त करणाऱ्या भयंकर अशा दुर्गादेवीच्या दुष्काळापायी या लोकांनी उत्तरेकडे स्थलांतर केले."[९] ते ठाणेमार्गे उत्तर-पूर्वेकडे पसरलेले दिसून येतात. कोकण हे त्यांचे मूळ स्थान असले तरी आज तेथे या कोकणांची वस्ती दिसत नाही. आज कोकणात जी कोकणी बोली (प्रदेशवाचक शब्द) बोलली जाते ती आणि या कोकणांची कोकणी बोली (जातीवाचक शब्द) यात खूप तफावत आहे. किंबहुना या दोन्ही बोली वेगवेगळ्या बोली आहेत असे प्रतीत होते.

डांग प्रदेशातही कोकणा लोकांचे प्राबल्य आहे. "सन १८७२ च्या डांगच्या जनगणनेमध्ये ७४२६ भिल आणि ६५१७ कोंकणा असल्याची नोंद आहे."[१०] तर २००१ च्या जनगणनेनुसार भिल्ली १९३४६ आणि कोंकणी २४१०८ होते अशी नोंद आहे.[११] याचा अर्थ भिल्लांच्या बरोबरीने किंबहुना थोडे अधिक कोकणा लोक डांग जिल्ह्यात राहतात. त्यामुळे त्यांचा प्रभाव डांग जिल्ह्यातील बोलीवर पडणे साहजिकच आहे.

भिल्ल जमातीचा इतिहासही पाहण्यासारखा आहे. भिल्ल जमातीचा भू-प्रदेश कोकणांहून अधिक व्यापक आहे असे दिसते. ही जमात महाराष्ट्राबरोबरच गुजरात, मध्यप्रदेश आणि राजस्थानातही आढळून येते. "'सातपुडा प्रदेश' हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यात राजस्थान, गुजरात आणि मध्यप्रदेशातील पर्वतरांगा, विंध्य आणि अरवली पर्वतांचा भाग, महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, अमरावती आणि औरंगाबाद जिल्ह्यांतील सातपुडा आणि अजिंठा पर्वतरांगांचा समावेश होतो. सातपुडा पर्वतात लहानमोठ्या अनेक नद्या उगम पावत असल्या तरी हा प्रदेश प्रामुख्याने तापी आणि नर्मदा नद्यांच्या खोऱ्यांमधील प्रदेश म्हणून ओळखला जातो. या दोन नद्यांच्या मधील प्रदेश 'भिलवाड' (भिल्लांचा प्रदेश) या नावाने ओळखला जातो. इतिहासातील 'भिलवाड' प्रदेशाची भौगोलिक सीमा मात्र याहीपेक्षा खूप मोठी होती. सातपुड्यापासून विंध्य, अरवली पर्वतांच्या रांगांपर्यंत म्हणजे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात आणि राजस्थानपर्यंत हा प्रदेश पसरलेला होता."[१२] या विस्तीर्ण प्रदेशात आज भिल्लांच्याच अनेक उपजाती पाहायला मिळतात. जसे की गामीत, तडवी, मावची, वसावा, वळवी, पावरा, मथवाडी, ढाणका इत्यादी. ह्या जाती-उपजाती संस्कृतीची पाऊलवाट चालतांना काहीवेळा एकत्र येतात तर काहीवेळा विभक्त होतात.

"प्रभू रामचंद्र जेव्हा दण्डकारण्यात आले तेव्हा त्यांना शबरी नावाची भिल्लीण भेटली होती हे आपण अनेक वेळा वाचलेले आहे. त्याकाळी या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना 'शबर, किरात, निषाद' या नावाने ओळखले जाई. हे लोक दुसरे तिसरे कोणी नसून सातपुड्यातील भिल्लच होत"[१३] अशी नोंद गोविंद गारे करतात. रामायणातील शबरी ही सध्याच्या डांग जिल्ह्यातील होती हे आता सिद्ध झाले आहे. ज्याअर्थी शबरी भिल्लीण होती त्याअर्थी भिल्ल जमातीचा डांग जिल्ह्यातील हा

पहिला लिखित पुरावा आहे असे म्हणता येते. मात्र रामायणकालीन शबरी व तिच्या जात बांधवांची म्हणजेच भिल्लांची भाषा किंवा बोली कोणती होती हे निश्चितपणे सांगता येत नाही.

हा सगळा धांडोळा घेतल्यानंतर 'कोकणी' आणि 'भिल्ली' हे जातीवाचक शब्द आहेत हे लक्षात येते. महाराष्ट्रातील सध्याच्या कोकणात बोलल्या जाणाऱ्या कोकणीचा आणि डांग प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या कोकणीचा वेगळा, स्वतंत्र विचार करावा लागेल. येथे मात्र डांग प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या कोकणीचाच विचार केलेला आहे.

७. ४. ३. 'डांगी' हा प्रदेशवाचक शब्द:

ज्याप्रमाणे कोकणा किंवा भिल्ल या जमाती आहेत त्याप्रमाणे डांग ही काही जात किंवा जमात नाही. तसे पाहता एकेकाळी कोकणा किंवा कोकणी हे जमातीचे नावसुद्धा प्रदेशावरूनच पडलेले आहे. म्हणजेच महाराष्ट्रातील समुद्र किनाऱ्यापासून सह्याद्री पर्वतरांगांपर्यंत पसरलेल्या कोकण प्रदेशावरून हे नाव पडलेले आहे. कोकणा जमातीचे मूळ वसतीस्थान कोकण असल्याने त्यांना हे नाव मिळाल्याचे म्हटले जाते. परंतु १४०८ नंतर कोकणांनी या प्रदेशाकडे परत वळून पाहिले नाही. त्यामुळे आज जरी त्यांना कोकणा, कोकणी, कुंकणा, कुणबी अशी कोकण प्रदेशावरून नावे पडली असली तरी त्यांचा सध्या कोकण प्रदेशाशी काहीही संबंध नाही. त्यांची बोलीही सध्याच्या कोकण प्रदेशातील बोलीहून निराळी आहे. म्हणून प्रस्तुत ठिकाणी मी कोकणी हा जातीवाचक शब्द असल्याचे म्हटले आहे.

कोकणीसारखेच भिल्ली बोलीसंदर्भातही म्हणता येते. आधी म्हटल्याप्रमाणे एकेकाळी भिल्ल लोक 'भिलवाड' प्रदेशात राहात होते. या भिलवाड प्रदेशात राहणाऱ्या लोकांना भिल्ल आणि त्यांच्या बोलीला भिल्ली असे म्हटले जात होते. परंतु आज यांचाही संबंध भिलवाड शब्दाशी तुटला आहे. तो फक्त आज जमातीला चिकटून आहे. कारण भिल्ल लोक आणि त्यांची भिल्ली बोली भिलवाड प्रदेशाच्या सीमा ओलांडून पलीकडे गेली आहे. याच कारणास्तव येथे 'भिल्ली' हा शब्द प्रदेशाशी संबंधित नसून फक्त जमातीशी संबंधित राहिला आहे असे मला वाटते.

'डांगी' हा शब्द मात्र निर्विवादपणे प्रदेशवाचक शब्द आहे. डांग शब्दाचे अनेक अर्थ आपण याआधी सविस्तरपणे पाहिले आहेत. त्यांचा थोडक्यात आशय असा की, डांग म्हणजेच जंगल, डांग म्हणजेच डोंगर-टेकड्यांचा प्रदेश, डांग म्हणजेच बांबू, डांग म्हणजेच अरण्यमय प्रदेश इत्यादी. या सगळ्यांतून डांग हा एक विशिष्ट असा प्रदेश आहे असे सूचित होते. आणि या विशिष्ट प्रदेशात जे लोकं राहतात त्यांना 'डांगी' लोकं असे म्हणतात. शिवाय त्यांच्या बोलीलाही 'डांगी' बोली असेच म्हणतात. त्यामुळे डांग किंवा डांगी हा शब्द कोकणी किंवा भिल्ली या शब्दांप्रमाणे जातीवाचक नसून तो निर्विवादपणे प्रदेशवाचक शब्द आहे हे सिद्ध होते.

७. ५. डांगी बोलीवर अन्य भाषा आणि बोलींचा प्रभाव:

जगातील कोणतीही भाषा किंवा बोली घेतली तरी तिच्यावर अन्य कोणत्या तरी भाषा किंवा बोलीचा प्रभाव आहे असे लक्षात येते. एखादी भाषा किंवा बोली निर्माण होण्यासाठी एक किंवा अनेक भाषा किंवा बोलींचा हातभार लागलेला आहे असे लक्षात येते. ही प्रक्रिया पुढील विकासाच्या टप्प्यातही सतत चालू असते असे आता अभ्यासक-संशोधकांनी सिद्ध केले आहे. यावरून कोणतीही भाषा किंवा बोली पूर्ण विकसित किंवा पूर्ण अविकसित आहे असे निश्चितपणे म्हणता येत नाही. म्हणजेच एखादी भाषा श्रेष्ठ आणि एखादी भाषा कनिष्ठ आहे असे म्हणता येत नाही.

डांगी बोलीवरही अन्य काही भाषा आणि बोलींचा स्पष्टपणे प्रभाव पडलेला आहे असे दिसून येते. हा प्रभाव प्रामुख्याने मराठी, गुजराती आणि अहिराणीचा आहे असे दिसून येते.

७. ५. १. डांगी बोलीवर मराठी भाषेचा प्रभाव:

डांगी बोलीवर मराठी भाषेचा प्रभाव आहे हे आता गुजराती भाषाभ्यासकांनीही मान्य केले आहे; हे त्यांच्या गुजराती भाषेतील भाषाविज्ञानाची पुस्तके वाचतांना लक्षात येते. फादर रेमंड चौहाण Perspective Plan for the Dangs.... च्या आधारे म्हणतात, "मराठीच्या प्रभावासाठी दोन कारणे जबाबदार आहेत. एक डांग प्रदेश महाराष्ट्राच्या सीमेवर आहे, त्यामुळे मराठी बोलणाऱ्या लोकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. आणि दुसरे गुजरात राज्याची वेगळी राज्य म्हणून रचना होण्याआधी डांग महाराष्ट्र राज्याच्या कायदेशीर अधिकारात होता."[१४] इतिहासाची पाने उलगडतांना आपल्याला अशी अनेक उदाहरणे दिसतात. ज्यामध्ये कधी डांग हा प्रदेश नाशिक जिल्ह्याला, कधी खानदेश प्रांताला, कधी बागलाण प्रांताला तर कधी सुरत जिल्ह्याला जोडला गेला होता. त्यामुळे डांगवर आणि डांगी बोलीवर मराठी भाषेचा प्रभाव पडणे स्वाभाविक होते. कोकणा चौदाव्या-पंधराव्या शतकात डांगमध्ये आले तेही मराठी मिश्रित कोकणी बोली घेऊन आले. त्यांचाही प्रभाव डांगी बोलीवर पडणे स्वाभाविक होते. वारलीही महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरून डांगमध्ये आले तेही त्यांची मराठी मिश्रित वारली बोली घेऊन. त्यांचाही प्रभाव पडणे स्वाभाविक होते. अशी एक ना अनेक कारणे आहेत की ज्यामुळे डांगी बोलीवर मराठी आणि इतर बोलींचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. यादृष्टीने मराठीतून जसेच्या तसे डांगी बोलीत आलेले काही शब्द पाहता येतील. उदा. आखूड, लांब, आज, उद्या, आंबा, आंबट, उखळ, उन, वारा, कासरा, कांदा असे अनेक शब्द सांगता येतील. परंतु त्यांचा पुढे स्वतंत्र 'डांगी बोलीचा शब्दसंग्रह' या मथळ्याखाली विचार केला गेला आहे. या डांगी बोलीच्या शब्दसंग्रहाचे अवलोकन केल्यास मराठी भाषेचा डांगी बोलीवर असलेला प्रभाव सहज लक्षात येईल.

७. ५. २. डांगी बोलीवर गुजराती भाषेचा प्रभाव:

ज्याप्रमाणे मराठी भाषेचा डांगी बोलीवर असलेला प्रभाव स्पष्टपणे जाणवतो; त्याचप्रमाणे गुजराती भाषेचाही डांगी बोलीवर असलेला प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. याचे प्रमुख कारण म्हणजे डांग जिल्हा हा आज गुजरात राज्यात समाविष्ट करण्यात आला आहे. येथील शैक्षणिक भाषा गुजराती आहे हे दुसरे महत्त्वाचे कारण सांगता येईल. त्याशिवाय भिल्ल जमात डांगच्या उत्तर भागातून येऊन डांगमध्ये स्थिरावली. भिल्लांच्या भिल्ली बोलीवर गुजराती भाषेचे विशेष प्राबल्य आहे असे अभ्यासकांचे मत आहे. ही जमात सर्वप्रथम डांगमध्ये आली असल्याचा पुरावा रामायणकालीन आहे. मात्र त्यावेळी स्थानिक भाषा किंवा बोली कोणती होती हे निश्चितपणे सांगता येत नाही. त्यानंतर गामीत नावाची जमात डांगमध्ये वास्तव्य करून आहे. त्यांच्या गामीत बोलीवरही गुजराती भाषेचा मोठा प्रभाव आहे. म्हणजेच डांगमध्ये राहणाऱ्या काही प्रमुख जमातींपैकी भिल्ल आणि गामीत ह्या गुजराती भाषेच्या प्राबल्याखाली वावरणाऱ्या असल्याने गुजराती भाषेचा प्रभाव डांगी बोलीवर पडला आहे असे म्हणता येते. यादृष्टीने गुजराती भाषेतून जसेच्या तसे डांगी बोलीत आलेले शब्द पाहणे रोचक ठरेल. उदा. खांड (साखर), दिवासळी (आगपेटी), कुवा (विहीर), ककास (जोराचा आवाज), शेरडी (ऊस), आगळ (पुढे), पासळ (मागे) असे अनेक शब्द आढळतात.

शैक्षणिकदृष्ट्या डांगी बोलीवर गुजराती भाषेचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. येणाऱ्या काळात हा प्रभाव अधिकच दृढ होईल यात शंका नाही. यादृष्टीने आज घराघरात गुजराती भाषेचे वारे

वाहू लागले आहे असे म्हणता येते. कारण घरातील मंडळी लहानपणापासूनच मुलांना गुजराती शिकविण्याचा प्रयत्न करत आहेत. जेणेकरून पुढे गुजराती भाषेमध्ये मुलांना अडचणी येऊ नयेत. एका परीने त्यांचा हा निर्णय योग्यच आहे. कारण मुलांना पुढे जाऊन गुजराती माध्यमाच्या शाळेत शिकावे लागते. डांगी बोलीला स्वतंत्र लिपी नाही, डांगी बोली शिक्षणाचे माध्यम नाही, मराठी माध्यमाच्या शाळा १९६० नंतर हळूहळू बंद पडून त्या आता नामशेष झाल्या आहेत, त्यांना गुजराती भाषेवाचून दुसरा पर्याय नाही, त्यामुळे त्यांचा हा विचार योग्य वाटतो. परंतु भाषेच्या दृष्टीने मात्र हे योग्य नाही. अशाने त्यांची बोली मरते. त्यामुळे त्यांना त्यांच्या डांगी बोलीतूनच प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे. प्राथमिक शिक्षण स्थानिक बोलीभाषेतून दिले जावे ही गोष्ट आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये लक्षात घेतली गेली आहे. परंतु या धोरणाची कितपत अंमलबजावणी होईल हे येणारा काळच ठरवेल. मात्र आतापर्यंत गुजराती भाषेने डांगी बोलीवर बरेच मनोराज्य मिळविले आहे. पेला (पहिली), बीजा (दुसरी), तीजा (तिसरी), चोथा (चौथी), चोपडी (पुस्तक), चोपडां (पुस्तके), कागळ (कागद), कागळया (कागदपत्र), आवकनो दाखलो (उत्पन्नाचा दाखला), भनुला (शिकायला), भनवुला (शिकवायला) असे अनेक गुजराती शैक्षणिक शब्द डांगी बोलीत घुसले आहेत. यावरून गुजराती भाषेचा डांगी बोलीवर प्रभाव होता, आहे आणि पुढे वाढत जाईल यात शंका नाही.

७. ५. ३. डांगी बोलीवर अहिराणी बोलीचा प्रभाव:

डांगी बोलीवर अहिराणीचा (खानदेशीचा) प्रभाव असल्याचे सर्वप्रथम जॉर्ज ग्रिअर्सनने १९०७ साली त्यांच्या 'Linguistic Survey of India' च्या नवव्या खंडातील तिसऱ्या भागात नोंदवले. अहिराणीत आणि खानदेशीत पूर्वी भेदभाव केला जात नव्हता. एकाच बोलीची ही दोन नावे होती. त्यातील अहिराणी हे जातीवाचक नाव तर खानदेशी हे प्रदेशवाचक नाव होते. परंतु "जळगाव जिल्ह्यातील अहिराणीच्या थोड्या वेगळया स्वरूपाला आता खानदेशी म्हटले जाते."[१५] येथे खानदेशी शब्दाचा अर्थ अहिराणी असेच घेतले आहे. कारण जळगाव जिल्ह्यातील खानदेशीचा आणि डांगी बोलीचा विशेष संबंध नाही हे लक्षात घ्यावे.

अहिराणी बोलीचा मराठी आणि गुजराती भाषेप्रमाणे डांगी बोलीवर सर्वार्थाने प्रभाव आहे असे म्हणता येत नाही. कळवण, बागलाण (सटाणा), साक्री आणि नवापूर या तालुक्यांच्या प्रभावाखाली येणाऱ्या डांग प्रदेशावर मात्र अहिराणी बोलीचा दृढ प्रभाव पडल्याचे दिसून येते. जसे जसे डांग जिल्ह्याच्या केंद्रस्थानाकडे येतो तसे तसे अहिराणी बोलीचा प्रभाव कमी कमी झाल्याचे दिसून येते. याच कारणास्तव डॉ. अमृत कुंवरसारखे डांगी बोलीचे अभ्यासक म्हणतात, 'खरी डांगी बोली ही वघई ते सामगहाणच्या दरम्यान म्हणजेच डांग जिल्ह्याच्या पश्चिम-दक्षिण भागात आढळते.' या भागावर अहिराणी बोलीचा प्रभाव फारसा दिसून येत नाही.

"मराठीतल्या षष्ठीत चा, ची, चे वापरतात तर अहिराणीतील षष्ठीत ना, नी, ने वापरतात."[१६] डांगी बोलीतही अहिराणीप्रमाणेच षष्ठीत ना, नी, ने वापरतात. उदा. आमना (आमचा), आमनी (आमची), आमने (आमचे) याप्रमाणे. डांगी बोलीवर हा अहिराणी बोलीचा प्रभाव आहे असे म्हणावे लागते.

७. ६. भाषा संपर्काची कारणे:

भाषा संपर्काची कारणे शोधतांना त्या समाजाचे इतर समाजाशी येणारे विविधमार्गी संबंध लक्षात घ्यावे लागतात. हे संबंध भाषिक तसेच सांस्कृतिक पातळीवर जोडलेले असतात. एक व्यक्ती

दुसऱ्या व्यक्तीशी विविध कारणाने जोडलेली असते. एक समाजगट दुसऱ्या समाजगटाशी जोडलेला असतो. ही जोडली जाण्याची प्रक्रिया अव्याहतपणे चालू असते. त्यातून भाषा संपर्क घडून येतो. भाषा संपर्कामुळे सतत भाषेत परिवर्तन होत असते. त्यामुळे एका कालखंडाची भाषा दुसऱ्या कालखंडात सारखी नसते. त्या दोन्ही कालखंडातील भाषेमध्ये परिवर्तन होण्यामागे अनेक कारणे असतात. अशीच भाषा संपर्काची कारणे डांगी बोलीच्या संदर्भात पडताळून पाहणे महत्त्वाचे आहे.

७. ६. १. बाजारहाट:

ग्रामीण भागातील आठवडी बाजाराची संकल्पना सर्वपरिचित आहे. सात वारांतील एखाद्या विशिष्ट वाराची आणि विशिष्ट स्थानाची निवड करून तेथे हे आठवडी बाजार आयोजित होत असतात. डांग जिल्ह्यातही आठवडी बाजाराची पद्धत प्रचलित आहे. डांगमध्ये वघई (बुधवार), सामगहाण (रविवार), गलकुंड (मंगळवार), साकरपातळ (गुरुवार), पिपलदहाड, सुबीर, सिंगना, महाल, लवचाली, कालीबेल, बारीपाडा[१७] अशा अनेक ठिकाणी बाजार भरतात. हे सगळे बाजार आठवडी बाजार आहेत. या बाजारांमध्ये गावागावातून आदिवासी लोकं एकत्र येतात. ग्राहकांबरोबरच व्यापारीवर्गही अनेक ठिकाणाहून येतो. यात डांग जिल्ह्यातील व्यापाऱ्यांबरोबरच महाराष्ट्रातील सुरगाणा, कळवण, साक्री, नवापूर अशा सीमाभागातील तालुक्यातून व्यापारी सहभागी होत असतात. ते आपल्या मालाबरोबरच त्यांची स्वतःची भाषा किंवा बोलीही वाहून आणतात. आणि जातांना डांगी बोलीचे बीजही घेऊन जातात.

ग्राहकांच्या दृष्टीने विचार करता ग्राहकही महाराष्ट्रातून डांग जिल्ह्यातील बाजारात येतात. तसेच डांग जिल्ह्यातील लोकंही सुरगाणा, पांगारणे, उंबरठाण, हतगड, नवापूर, साक्री या महाराष्ट्रातील आणि वासदा, व्यारा, सोनगढ या गुजरातमधील बाजारांमध्ये खरेदी-विक्रीसाठी जात असतात. अशी ही देवाणघेवाण अनंत काळापासून या प्रदेशात सतत चालू आहे.

७. ६. २. रोटी-बेटी व्यवहार:

डांग जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. तसेच महाराष्ट्रातील धुळे आणि नंदुरबार हे दोन जिल्ह्ये आदिवासी जिल्ह्ये म्हणून ओळखले जातात. तसेच नाशिक जिल्ह्याचा उत्तर भाग आदिवासी प्रदेश म्हणून ओळखला जातो. डांग, धुळे, नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने भिल्ल, कोकणा (डांगमध्ये कुकणा/कुणबी), वारली, गामित, मावची इत्यादी जमाती आढळतात. त्यामुळे त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होणे साहजिकच आहे. येथील आदिवासी एकाच गोत्रात विवाह करणे निषिद्ध मानतात. कारण ते कोणत्यातरी एकाच मूळ पुरुषापासून उत्पन्न झाले असावेत असे त्यांना वाटते. तसेच ते स्वतःची जमात सोडून दुसऱ्या जमातीत विवाह करत नाहीत. ते दुसऱ्या जमातीला कनिष्ठ किंवा वरिष्ठ मानतात. त्यामुळे ते त्यांच्याच जमातीत विवाह करण्यास पसंत करतात.

हल्ली मात्र मध्य गुजरात आणि उत्तर गुजरातमध्ये येथील गरीब कुटुंबातील बऱ्याच मुली विवाह करून गेल्याचे दिसते. हे सगळे विवाह जातीबाहेर झालेले आहेत. गावापासून बऱ्याच दूर मुलीला दिल्याने तिच्या जातीपातीची विशेष कोणी चौकशी करत नाही. ती वर्षातून एकदा किंवा दोनदाच माहेरी येत असते. त्यामुळे संबंधित कुटुंबावर जात बाटवण्याचा ठपका लागत नाही. जाती बाहेर विवाह करण्याचे कारण फक्त कुटुंबाची गरिबी हे आहे. गरिबीमुळे आई-वडिलांना मुलींचे लग्न करणे शक्य नसते. शिवाय मध्य आणि उत्तर गुजरातमधून आलेले स्थळ मुलीच्या आई-वडिलांना

मुलीच्या बदल्यात थोड्याफार पैशाचे लालचही देते. अशा लालचाला बळी पडलेली अनेक कुटुंबे डांगमध्ये आहेत. ही समस्या पुढे गंभीर रूप धारण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. कसेही असले तरी अशा विवाहांमुळे भाषा संपर्क घडून येतो.

७. ६. ३. शैक्षणिक भाषा:

डांगच्या शैक्षणिक भाषेचा विचार करता आपल्याला इंग्रज काळापासून विचार करावा लागतो. त्याआधीचा इतिहास डांगच्या दृष्टीने पुसट असल्याने किंवा ठोस पुरावे उपलब्ध नसल्याने कोणतेही मत मांडणे योग्य होणार नाही. परंतु इंग्रज काळापासून शैक्षणिक भाषेची पुष्टी करता येते. इंग्रजांनी भारतावर आपले राज्य स्थापित केल्यानंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांना धर्म प्रचाराची चांगलीच संधी प्राप्त झाली होती. धर्म प्रचारासाठी त्यांनी शिक्षण आणि आरोग्य ह्या दोन गोष्टी अवलंबल्या होत्या. पैकी शिक्षणाचा विचार करता त्यांनी डांगमध्ये अनेक शाळा चालू केल्या होत्या आणि त्या शाळांच्या शिक्षणाचे माध्यम मराठी होते.

नंतर २३ जून १९३७ रोजी 'डांग सेवा मंडळा'ची स्थापना करून दादासाहेब बिडकरांनी डांगमध्ये मराठीची बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या संस्थेच्या डांगमध्ये जवळपास १४० शाळा मराठी माध्यमातून सुरु करण्यात आल्या होत्या अशी नोंद सापडते. परंतु ह्या प्रयत्नाला १ मे १९६० नंतर म्हणजेच गुजरात आणि महाराष्ट्र या द्विभाषिक राज्याची विभागणी झाल्यानंतर उतरती कळा लागलेली दिसते. कारण १ मे १९६० रोजी डांग जिल्हा गुजरातराज्याला जोडला गेला. त्यामुळे स्वतंत्र आणि संबंध गुजरात राज्याची जी शैक्षणिक भाषा गुजराती तीच डांग जिल्ह्याला लागू झाली. याचा परिणाम म्हणून मराठी माध्यमाच्या शाळा हळूहळू बंद पडल्या. उरल्यासुरल्या मराठी माध्यमाच्या शाळांचे रीतसर गुजराती माध्यम केले गेले. आणि आजची स्थिती अशी आहे की, डांग जिल्ह्यात एकही मराठी माध्यमाची शाळा अस्तित्वात नाही. यावरून मराठीचे किती झपाट्याने गुजरातीकरण केले गेले हे लक्षात येते. आज डांगमध्ये वयाने साठ सत्तर वर्षे असलेले वृद्ध मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेले आढळतात. परंतु त्यांची पिढी जाताच मराठी शिक्षणाचाही गंध बाजूला सारला जाणार आहे. पुढील दोन पिढ्यांनंतर डांगमध्ये मराठी शिक्षणाचा गंधही राहणार नाही.

डांग जिल्ह्यात १ मे १९६० नंतर गुजराती भाषा ही शैक्षणिक भाषा म्हणून अस्तित्वात आली. तेव्हापासून प्रत्येक पिढीचे शिक्षणाचे माध्यम गुजराती झाले आहे. पुढे जागतिकीकरणानंतर इंग्रजी भाषेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. अनेक शाळा इंग्रजी भाषेला महत्त्व देऊ लागल्या. त्याचाही थोडाबहुत परिणाम नवीन पिढीवर हल्ली दिसू लागला आहे. मात्र शहरी भागापेक्षा हे प्रमाण अत्यल्प आहे असे म्हणता येईल. गुजरातीचा प्रभाव मात्र नोंद घेण्यासारखा आहे. आज घरातूनच लहान मुलांना डांगी बोलीऐवजी गुजराती भाषा शिकविली जात आहे. यावरून डांगी बोलीवर असलेला शैक्षणिक भाषेचा प्रभाव लक्षात येतो.

७. ६. ४. रोजगारासाठी मजुरांचे स्थलांतर:

डांग जिल्हा जंगल संपत्तीने परिपूर्ण, समृद्ध असला तरी आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. येथील जमीन डोंगर उताराची, जंगलाने भरलेली अशी आहे. शेतीच्या दृष्टीने खरीप पिकांचे उत्पादन घेतले जाते. रब्बी पिकांचे प्रमाण अत्यल्प, बागायती शेती कुठेही केली जात नाही. परिणामी येथील शेतकरी वर्गाला दिवाळीनंतर शेतीचे काम नसते. अशावेळी ते घाटावर (नाशिक जिल्ह्याचा उत्तर भाग) किंवा गुजरातमध्ये (डांग जिल्हा गुजरातमध्येच येत असला तरी डांगी प्रजेच्या दृष्टीने डांग आणि

गुजरात वेगवेगळे प्रदेश आहेत.) रोजगाराच्या शोधार्थ स्थलांतर करतात. घाटावर ते कांदे लावणे, मिरच्या तोडणे, तुरीच्या शेंगा तोडणे, मका तोडणे, सोयाबीन काढणे, बाजरी कापणे, द्राक्ष तोडणे अशी वेगवेगळी शेतीची कामे करतात. तर गुजरातमध्ये साधारणतः ते गवंडीच्या हाताखाली मजूर म्हणून बांधकाम करतांना दिसतात.

या स्थलांतरामुळे त्यांच्या बोलीभाषेत अनेक मराठी तसेच गुजराती शब्द आले आहेत. जे मजूर म्हणून दरवर्षी घाटावर कामाला जातात ते मराठी आणि जे मजूर म्हणून दरवर्षी गुजरातमध्ये कामाला जातात ते गुजराती भाषा बोलतात. काहीवेळा ते दीर्घकाळासाठी कामाला जातात अशावेळी त्यांच्या डांगी बोलीवर त्या त्या भाषेचा परिणाम होणे साहजिक आहे.

७. ६. ५. धर्मांतर:

धर्मांतराची परंपरा प्राचीन आहे. हिंदूंनी इतर कोणत्याही धर्मियांना धर्मांतर करण्यास विशेष भाग पाडले नसले तरी हिंदूंवर मात्र इतर अनेक धर्मियांनी धर्मांतराचा प्रहार केलेला आहे असे दिसते. जेव्हा १३४७ (बहामनी राज्यस्थापना) नंतर मुस्लिम राजवट भारतात आली तेव्हा मुस्लिम राजवटीच्या प्रभावाने हिंदूंनी मुस्लिम धर्म स्वीकारला किंवा स्वीकारण्यास भाग पाडले. हीच गत इंग्रजांच्या राजवटीत ख्रिस्ती धर्माविषयी झालेली दिसून येते. इंग्रज उघडपणे धर्मांतराला हातभार लावत नसले तरी छुप्या पद्धतीने त्यांनी ख्रिस्ती धर्मप्रसाराला राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या हातभार लावला होता असे जाणकारांचे मत आहे. ख्रिस्ती लोकांनी प्रामुख्याने दऱ्या-खोऱ्यातील, राना-वनातील आदिवासींवर धर्मांतराचा जोरदार प्रहार केला. त्यांनी आदिवासींवर आपले लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी दवाखाने, शाळा उघडल्या. वरवर पाहता अतिशय चांगले कार्य त्यांनी आदिवासींसाठी सुरु केले होते. परंतु त्याच्या मुळाशी त्यांचा धर्म प्रसाराचा कुत्सित हेतू होता हेही नाकारता येत नाही.

'आदिवासींचे धर्मांतर: एक समस्या' या छोटेखानी पुस्तकात प्रभाकर मांडे यांनी जोमोकेनिआटा यांचे ख्रिस्ती धर्माविषयीचे मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, "जेव्हा ते (ख्रिस्ती प्रसारक) आले तेव्हा आमच्याकडे जमीन होती व त्यांच्याकडे बायबल. त्यांनी आम्हाला डोळे बंद करून प्रार्थना करण्यास सांगितले. जेव्हा आम्ही डोळे उघडले तेव्हा आमच्या हातात बायबल होते आणि त्यांच्याकडे जमीन."[१८] हे जोमोकेनिआटा यांचे उद्गार वस्तुस्थितीला किती धरून आहे हे आपण एका तक्त्यावरून समजून घेऊ.

वाढत्या ख्रिश्चन लोकसंख्येचा निर्देशांक (टक्केवारीत अंदाजे)

राज्य	**१९६०**	**१९७१**	**१९९१**	**१९९९**
मणिपूर	१९.४९	२६.००	३४.१३	४०
मेघालय	३५.२४	४६.५०	६४.५६	७०
मिझोराम	८०.५६	८५.९२	८६.००	९०
नागालँड	५३.१२	६६.०६	८५.६५	९०
अरुणाचलप्रदेश	-	०.८५	१०.१९	३०

हा तक्ता उपर्निर्देष्टीत पुस्तकातील असून पुढे मांडे म्हणतात, "नागालँड, मेघालय, मिझोराम या प्रांतांतील आदिवासींच्या भावविश्वावर आघात करून त्यांचा बुद्धिभेद करण्यात आला आहे. तेथील धर्मांतरित आदिवासींची जीवनसरणी पूर्णपणे बदलली आहे. ख्रिस्ती झालेले आदिवासी आणि पारंपरिक जीवन जगणारे, यांच्यात मोठे अंतर निर्माण झाले आहे."[१९] म्हणजे एका धर्मांतरामुळे जीवनातील प्रत्येक स्तरावर किती बदल घडून येतो, किती उलथापालथ होते याचे हे उदाहरण आहे.

याला डांग जिल्हाही अपवाद आहे असे नाही. कारण ईशान्य भारताकडील आदिवासींप्रमाणेच डांग जिल्ह्यातही बहुसंख्य आदिवासी आहेत. आणि अशा बहुसंख्य आदिवासी प्रदेशावर ख्रिस्ती धर्म प्रसारकांचे लक्ष जाणार नाही असे होणार नाही. २०११ च्या जनगणनेनुसार डांग जिल्ह्यातील विविध धर्मानुसार लोकसंख्येचे केलेले वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

धर्मानुसार लोकसंख्येचे वर्गीकरण[२०]

अ.क्र.	धर्म	लोकसंख्या	टक्केवारी
१	हिंदू	२,०३,५४५	८९.२०
२	**<u>मुस्लिम</u>**	**३, ५९३**	**१.६०**
३	शीख	६९	०.००
४	**<u>ख्रिश्चन</u>**	**२०,०२९**	**८.८०**
५	बौद्ध	३२	०.००
६	जैन	३९	०.००
७	अन्य	५६०	०.२०
८	धर्म नाही दर्शवले असे	४२४	०.२०

वरील तक्ता पाहता ईशान्य भारतातील राज्यांसारखी मोठी आकडेवारी जरी दिसत नसली तरी १०-११ टक्के डांगमधील आदिवासी लोकांनी आज धर्मांतर केल्याचे सिद्ध होते. येथील धर्मांतरित ख्रिश्चन किंवा मुस्लिम मुळचे आदिवासी आहेत. ते बाहेरून आलेले नाहीत. ही फक्त कागदोपत्री माहिती झाली. याहून प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी आहे. मी डांगमध्ये भटकंती करत असता अनेक आदिवासी आज धर्मांतर करून चुकले आहेत असे दिसून आले आहे. मात्र हे धर्मांतर अजून कागदोपत्री उतरलेले नाही. नाहीतर वरील तक्त्यातील आकडे निश्चितच वाढतील अशी माझी खात्री आहे. कागदावर धर्मांतराची नोंद न करण्याचे कारणही ते सांगतात. त्यातील प्रमुख कारण म्हणजे, धर्मांतर केले असे दाखवले तर शासनाच्या आदिवासींसाठीच्या विविध योजनांचा लाभ मिळणार नाही. ही एक प्रकारची भीती त्यांच्या ठिकाणी दिसून येते. म्हणजेच घरात ख्रिश्चन आणि बाहेर आदिवासी अशी दुटप्पी भूमिका त्यांच्या ठिकाणी दिसून येते.

लोकगीतांचे संकलन करत असता मला असे आढळले आहे की, धर्मांतरित झालेले आदिवासी (स्त्री आणि पुरुष) आज लोकगीते म्हणत नाहीत. आदिवासींच्या देवदेवतांना पुजत नाहीत. सण-उत्सवात विशेष सहभाग घेत नाहीत. यावरून असे म्हणता येते की धर्मांतरित आदिवासी आज

पारंपरिक जीवन जगणाऱ्या आदिवासींपासून सांस्कृतिकदृष्ट्या दूर जात आहेत. याचा परिणाम त्यांच्या बोलीभाषेवरही झाल्याचे दिसून येते. उदा. मंदिराच्या जागी चर्च; दर्गा; मस्जिद, देवाच्या ठिकाणी गॉड; अल्ला असे अनेक शब्द आल्याचे दिसते.

७. ६. ६. इंग्रजी राजवट:

इंग्रजी राजवटीचा प्रत्यक्षपणे डांग जिल्ह्यावर प्रभाव पडला नसला तरी अप्रत्यक्षपणे प्रभाव पडलेला आहे हे नाकारता येत नाही. 'प्रत्यक्षपणे' आणि 'अप्रत्यक्षपणे' हे शब्द वापरण्याचे कारण असे की, डांग जिल्हा हा अनेक लहान-मोठ्या संस्थानांचा मिळून बनलेला प्रदेश होता. आणि तो इंग्रजी राजवटीतही बऱ्याचकाळपर्यंत स्वतंत्र होता. नंतरही इंग्रजांनी दुर्गम, जंगली प्रदेश म्हणून तिकडे विशेष लक्ष दिलेले दिसत नाही. मुळात इंग्रज या जंगली प्रदेशात शिरायला घाबरत होते. कारण इंग्रज अधिकारी या प्रदेशात दिसला की त्याच्यावर येथील भिल्ल राजांकडून किंवा स्थानिक, जंगलात राहणाऱ्या आदिवासींकडून धनुष्यबाणांनी किंवा बंदुकीने हल्ला चढवला जातो अशी एक आठवण दुर्गाबाई भागवत यांनी त्यांच्या डॉ. एल्विन या इंग्रज मित्रासंबंधी सांगितली आहे.[२१] म्हणून इंग्रजांचे शासन असूनही येथील स्थानिक कारभार मात्र राजांच्याच हाती होता असे म्हणावे लागते. त्यामुळे प्रत्यक्षपणे येथील आदिवासींचा संपर्क इंग्रजांशी आला नाही. तरीही अप्रत्यक्षपणे ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या पाठीशी उभे राहून डांग जिल्ह्यातील आदिवासींवर आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. या सर्व घडामोडींचा कमी अधिक प्रमाणात डांगी बोलीवर प्रभाव पडल्याचे दिसून येते.

७. ६. ७. धार्मिक स्थळे:

डांगच्या दृष्टीने धार्मिक स्थळांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. मुळातच डांगी आदिवासी श्रद्धाशील असल्याने त्यांच्या गाव शिवारात अनेक लहान मोठी धार्मिक स्थळे पाहायला मिळतात. त्यांच्या प्रत्येक गावात एकतरी मंदिर पाहायला मिळते. त्यात प्रामुख्याने हनुमानाचे मंदिर असते. गावाच्या सीमेवर वाघदेव, नागदेव, सूर्य, चंद्र यांच्या प्रतिमा असलेले विरगळ पाहायला मिळतात. ह्या सगळया देवता गावाच्या रक्षणासाठी स्थापन केलेल्या असतात अशी त्यांची दृढ श्रद्धा असते. त्याशिवाय काही देवता जागृत देवता म्हणून प्रसिद्ध पावल्या आहेत. त्यामध्ये मोठा देव, खोकरी हनुमान मंदिर, अताळा धाम, अंजनकुंड, शबरीधाम इत्यादी स्थळांचा उल्लेख करता येईल.

मोठा देव डांगमध्ये प्रसिद्ध असून तेथे भाविक भक्त आपले दुःख निवारणासाठी मोठ्याप्रमाणावर महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून येतात. मोठा देव नवसाला पावणारा म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे तेथे बहुतेक लोकं नवस घेण्यासाठी आणि ज्यांचे नवस पूर्ण झाले आहे असे नवस फेडण्यासाठी येतात. हे देवस्थान जंगलामध्ये असून तेथून एक लहान नाला जात आहे. नवस बहुतेकदा कोंबडा-बकरा बळी देऊन फेडला जातो. बळी दिलेल्या बोकडाचे मांस तिथेच शिजवून खाल्ले जाते, ते घरी घेतले जात नाही. त्यामुळे खाणारांची एकच गर्दी होते. यामध्ये डांगच्या भाविक भक्तांशिवाय महाराष्ट्रातून येणारे अनेक भाविक भक्त असतात. कारण कोणतेही असले तरी ते एकत्र येतात आणि एकत्र आल्याने त्यांच्यात व्यावहारिकदृष्ट्या संभाषण होणे अपरिहार्य असते. या संभाषणातून त्यांच्या शब्दांची देवाणघेवाण होते. ही शब्दांची देवाणघेवाण एकमेकांच्या बोलीभाषेवर परिणाम करणारी असते.

इतर अनेक देवस्थानांची किंवा धार्मिक स्थळांचीही थोडक्यात हीच स्थिती आहे. फक्त त्यांचे स्थान आणि श्रद्धा वेगवेगळ्या आहेत. येथे फक्त अनेक ठिकाणाहून येणारे भाविक भक्त आणि

त्यांच्याबरोबर येणारी त्यांची भाषा किंवा बोली यांची सरमिसळ झाली की एकमेकांच्या बोलीभाषेवर परिणाम होतो हे ध्यानात घ्यायचे आहे.

७. ६. ८. पर्यटन स्थळे:

पर्यटन स्थळांचा विचार करता डांग जिल्ह्यात सापुतारा हे अतिशय महत्त्वाचे पर्यटन स्थळ मानले जाते. त्याशिवाय गिराधोद (वघई), गिराधोद (गिरमाळ), शबरीधाम, पंपासरोवर, पांडव गुफा, डोन, चिंचली, महाल अशी अनेक पर्यटन स्थळे डांग जिल्ह्यात पाहायला मिळतात. शबरीधाम, पंपासरोवर, पांडवगुफा इत्यादींचा परिचय याआधी करून देण्यात आला आहे. सापुतारा या स्थळाचाही ओघवता परिचय आला आहे. तरी डांग जिल्ह्यातील एक अतिशय महत्त्वाचे थंड हवेचे ठिकाण म्हणून भारतात परिचित आहे. या दृष्टीने विचार करता सापुतारा येथे म्युझियम, बोटिंग, रोज गार्डन, सनसेट पॉईंट, रोपवे, इको पॉईटं, पॅरासूट, मच्छली घर, विविध धर्मीयांची मंदिरे पाहायला मिळतात. याशिवाय घोड्यांची सफरही करता येते. पावसाळ्यातील हिरवेगार आणि धुक्यांनी अर्धवट झाकलेले डोंगर, डोंगरावरून पडणारे पाणी, बहुविध झाडांची रेलचेल, हिरवीगार शेते, पक्ष्यांची चिवचिवाट, उन्हाळ्यात शरीराला हवी हवीशी वाटणारी थंडगार हवा या सगळ्या गोष्टींमुळे देशभरातील पर्यटकांची येथे गर्दी होते. सापुतारा हे ठिकाण गुजरात आणि महाराष्ट्र यांच्या सीमेवर आहे. सापुतारा सोडताच पुढे महाताष्ट्राची सीमा सुरु होते. येथून नाशिक अवघ्या ८० किलोमीटरवर आहे.

येथे मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी यात्रा (मेळा) भरते. यात प्रामुख्याने युवा वर्गाचा समावेश असतो. यात्रा म्हणताच धार्मिक स्थळांची आठवण होते. भारतातील बहुतेक यात्रांचे आयोजन धार्मिक स्थळीच केले जाते. परंतु येथे अनेक धर्मीयांची प्रार्थनास्थळे असूनही या यात्रेला धार्मिकतेचे अधिष्ठान नाही. ही यात्रा फक्त मौजेखातर आयोजित होते असे एकूण यात्रेचे निरीक्षण करता म्हणता येते. या दिवशी स्थानिक लोकांची एकच गर्दी होते. 'डांगातली माणसं आणि घाटावरची माणसं' यांचे एकत्रीकरण झालेले या दिवशी पाहायला मिळते.

याशिवाय गिराधोद नावाच्या धबधब्याचे निसर्गरम्य दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी उसळत असते. गिराधोद नावाचे दोन धबधबे डांगमध्ये असून एक वघईजवळ आहे तर दुसरा गिरमाळजवळ आहे. त्याशिवाय अजून काही लहान मोठे धबधबे डांगमध्ये पाहायला मिळतात. या पर्यटन स्थळांचा थोडक्यात परिचय करून देण्याचा उद्देश हाच की या ठिकाणी अनेक ठिकाणाहून पर्यटक येतात आणि जातात. त्यांचा कळत नकळत येथील स्थानिक डांगी आदिवासींशी संपर्क येतो. हा संपर्क सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक अशा स्वरूपाचा असतो. याचाही परिणाम डांगी बोलीवर होतो असे म्हणता येते. यादृष्टीने त्यांच्या बोलीत म्युझियम, बोटिंग, रोपवे, सनसेट पॉईंट, इको पॉईंट, रोज गार्डन, पॅरासूट असे अनेक इंग्रजी शब्द घुसलेले आहेत.

७. ६. ९. संपर्क साधने:

आज संपर्क साधनांची वाढ, प्रसार आणि प्रचार वेगाने होतांना दिसते आहे. सगळ्यांनाच ही संपर्क साधने हवी हवीशी वाटतात. कोणी गरजेखातर तर कोणी मनोरंजनाच्या दृष्टीने त्यांचा स्वतःला पाहिजे तसा वापर करून घेतांना दिसत आहे. पावलोपावली त्यांची गजर भासते आहे. या संपर्क

साधनांमध्ये प्रामुख्याने मोबाईल, दूरदर्शन (टी. व्ही.), रेडीओ, कॉम्पुटर, वृत्तपत्र, विविध प्रकारच्या जाहिराती यांचा समावेश होतो. या सगळयांचा प्रभाव माणसाच्या जीवनावर पडलेला आहे. याला अपवाद डांग जिल्ह्यातील दऱ्याखोऱ्यात राहणारे आदिवासीही नाहीत. त्यांच्याही जीवनावर उपरोक्त विविध संपर्क साधनांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. आज दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या, गुरे चारणाऱ्या अशिक्षित गुराख्याकडेही एखादा साधा मोबाईल पाहायला मिळतो. अर्थात हा मोबाईल गाणे ऐकण्यापुरता, मनोरंजनाच्या दृष्टीने बाळगलेला असतो. त्या व्यक्तीला विशेष कोणाशी संपर्क साधण्याची गजर नसते. तरीही त्या संपर्क साधनाचा प्रभाव त्या व्यक्तीच्या जीवनावर पडल्याचे यादृष्टीने म्हणता येते. ज्याअर्थी अशिक्षित, अडाणी गुराख्याकडे एखादा मोबाईल आढळतो त्याअर्थी तेथील समाजावर या संपर्क साधनांचा किती प्रभाव पडला असेल याचा अंदाज बांधता येतो. या दृष्टीने त्यांच्या बोलीभाषेत मोबाईल, टी. व्ही., रेडीओ, न्यूजपेपर, नेटवर्क, टॉवर, रेंज, बॅलेंस, कॉल, हॅलो, हॉस्पिटल, मेडिकल, मॅच, रन, स्कोर, सीरिअल, ब्रेक, लॅपटॉप, कॉम्पुटर, इंटरनेट असे अनेक परभाषी शब्द घुसले आहेत.

७. ७. अन्य भाषेतून डांगी बोलीत आलेले शब्द:

- **हिंदी:** बच्चा, तपास, कुवा, फालतू, बराबर, मांडव, घोडा, जल्दी, दोस्तार (दोस्त), वखत (वक्त), बिमार, कोसीस (कोशीश), वेपारी (व्यापारी) इत्यादी.
- **इंग्रजी:** फुल, हाप (हाफ), होटल (हॅाटेल), बेस (बेस्ट), बूट, मोबाईल, इंटरनेट, रिचार्ज, चारजिंग (चार्जिंग), सिमकाड (सिमकार्ड), रेंज, नेटवर्क, टेबल, कार, रोड, स्टेसन (स्टेशन), होस्पिटल (हॉस्पिटल), बुक, पेन, पेन्सिल, टाईम, सर्ट (शर्ट), कोलेज (कॉलेज), कलर, कलेक्टर, टेन्सन (टेन्शन), डब्बल (डबल), नंबर, वायर, सायकल, हायस्कूल इत्यादी.
- **अरबी-फारसी:** खेतर (खेत), खर्स (खर्च), गुलाब, चस्मा (चष्मा), चाकू, दुकान, तारीख, बाग, तपास, जमीन, दरजी (दर्जी), अमीर, अस्सल (असल), तीर, जिलेबी (जलेबी), गलुल/गलोड (गलोल), कारबार (कारभार), बुरुज, येद (याद), रिवाज, बजार (बाजार), खबर, सायेब (साहेब) इत्यादी.
- **प्राकृत:** कान, घर, पाय, सासू(स), सासरा(स), गाव, काम, घाम, चाक, पान, लोहार, आगास, मोड, फोड, ताड इत्यादी.
- **संस्कृत:** राजा, गुरु, धर्म, भगवान, पृथ्वी, वास, मानुष, धनु, धर, पिंड, खोड, गुज्जा, दगड, तिखट, हळद इत्यादी.

७. ८. उच्चार प्रक्रिया/स्वन परिवर्तन:

उपरोक्त अन्य भाषेतून डांगी बोलीत आलेल्या शब्दांचा विचार करता असे दिसून येते की, प्रत्येक शब्द जसेच्या तसेच आलेले नाहीत. त्यात काहीना काही बदल झाल्याचे दिसून येते. कोणत्याही भाषेतील शब्दांची आयात करतांना त्यात स्वभाषेच्या विशिष्ट उच्चार प्रक्रियेने बदल करून आयात केली जाते. आता ही विशिष्ट उच्चार प्रक्रिया म्हणजे काय? तर त्याला काही व्याकरणिक संज्ञा आहेत. उदाहरणार्थ स्वरलोप, व्यंजनलोप, स्वरागम, व्यंजनागम, स्वरभक्ती, महाप्राणागम, महाप्राणलोप इत्यादी. यांचे परत उपप्रकार पाडले जातात. या उच्चार प्रक्रियेत काही शब्दांची काटछाट करून अथवा काही शब्दांत अधिकची भर घालून आपल्या सोयीनुसार शब्दांत

बदल केले जातात. यादृष्टीने डांगी बोलीचा विचार केल्यास डांगी बोलीवर अधिक प्रकाश पडेल असे मला वाटते.

- **आद्य स्वरलोप:** आद्य स्वरलोप या प्रक्रियेमध्ये धातूतील काही ध्वनींचा लोप होतो. आणि मग त्या धातूचा इतर शब्दांशी संबंध येतो. ज्या वेळी धातूतील आद्य स्वराचा लोप होतो तेव्हा त्या प्रक्रियेला आद्य स्वरलोप असे म्हणतात. उदा. उकिरडा-वखरडा, उकीर-वकीर, उचकी-गुचकी, उसळ-हुसळ, उतू-वतू, एक-येक, एकजीव-येकजीव, एकता-येकता, एकवार-येकवार, एकेक-येकक, ओकारी-वकरी, ओघळ-वघळ, ओटा-वटा, ओटी-वटी, ओहोळ-वहळ, ओढाताण-वडाताण, ओल-वल, ओलसर-वलसर, ओठ-होट, ओसरी-वसरी, ओळख-वळख इत्यादी. येथे 'अ, आ, इ, ई, ऊ, ऐ, औ' या स्वरांचा आद्यस्थानी लोप होत नाही. 'उ, ए, ओ' या स्वरांचे 'व' होतांना दिसते. तर क्वचित प्रसंगी 'ओ' चे 'हो' होतांनाही दिसते.
- **मध्य स्वरलोप:** मध्य स्वरलोपाची उदाहरणे विशेष आढळत नाहीत. तरीही आपल्याला काही उदाहरणे देता येतात. जशी डेअरी- डेरी, माऊली-मावली, भुईमूग-भुयमूग, भुईघर-भुयघर, बढाईखोर-बडायखोर, भाईबंद/भाऊबंद-भायबंद, महिना-महना इत्यादी. याठिकाणी दीर्घ 'ई' चे 'य' मध्ये रुपांतर झालेले दिसून येते. तर 'ऊ' चे 'य' किंवा 'व' होतांना दिसून येते.
- **अंत्य स्वरलोप:** अंत्य स्वरलोपामध्ये शेवटचा स्वर लोप होतो. अथवा अंत्य स्वराच्या जागी व्यंजन येते. उदा. कामचलाऊ-कामचलाव, नदी-नय, गेली-गय, केली-कय, मेली-मय इत्यादी शब्दांचा येथे उल्लेख करता येईल. 'ऊ' आणि दीर्घ 'ई' चा 'य' या व्यंजनात रुपांतर झालेले दिसून येते.
- **आद्य व्यंजनलोप:** ज्याप्रमाणे स्वरांचा आद्य, मध्य आणि अंत्य लोप होतो. तसाच तो व्यंजनांचाही आद्य, मध्य आणि अंत्य लोप होतो. यामध्ये आद्य व्यंजन लोप पावून त्या ठिकाणी स्वर येते. उदा. विळा-इळा, विंचू-इचू, वीस-ईस, विचार-इचार, विकत-इकत, वीट-ईट, विडी-इडी, विमान-इमान, विषारी-इसारी, विसर-इसर, विसावा-इसवा, वीज-ईज इत्यादी. येथील उदाहरणांचे निरीक्षण करता असे लक्षात येते की, आद्य 'व' या व्यंजनाचा लोप होऊन त्या ठिकाणी ऱ्हस्व 'इ' किंवा दीर्घ 'ई' चा प्रवेश होतो. म्हणजेच 'व' या लोप पावणाऱ्या व्यंजनानंतर येणारा ऱ्हस्व 'इ' किंवा दीर्घ 'ई' हा जसाच्या तसाच शिल्लक राहतो.
- **मध्य व्यंजनलोप:** यात शब्दाच्या मध्यभागी असलेल्या व्यंजनाचा लोप होतो. अथवा मध्यस्थानी असलेल्या व्यंजनाच्या जागी स्वर येतो. उदा. पिवळा-पिळा, रविवार-रइवार, रुपये-रूपे, दिवस-दिस इत्यादी. डांगी बोलीमध्ये मध्य व्यंजनलोपाची उदाहरणे जास्त आढळत नाहीत.
- **अंत्य व्यंजनलोप:** अंत्य व्यंजनलोपामध्ये शेवटी येणारे व्यंजन लोप पावते. या लोप पावणाऱ्या शेवटच्या व्यंजनाच्या जागी दुसरे व्यंजन किंवा स्वर येत नाही. उदाहरणार्थ बेस्ट-बेस, बाबा (वडील या नात्याने)-बा, दोन-बे, सहा-स/छ, रात्र-रात इत्यादी.

- **आद्य स्वरागम:** आद्य स्वरागमाची उदाहरणे आपल्याला इंग्रजीच्या शब्दांच्या बाबतीत जास्त मिळतात. यात धातूच्या आद्यस्थानी एखाद्या स्वराचे आगमन झालेले दिसते. म्हणून त्याला आद्य स्वरागम असे म्हटले जाते. उदाहरणार्थ स्कूल-इस्कुल, स्कूटर-इस्कुटर, स्टॉप-इस्टोप, स्टँड-इस्टेंड इत्यादी. तर क्वचित एखाद्या मराठी धातुच्याही बाबतीत आद्य स्वरागम झालेले दिसते. जसे बस-बिस. पण अशी उदाहरणे जास्त सापडत नाहीत.
- **मध्य स्वरागम:** मध्य स्वरागमाचीही उदाहरणे विशेष सापडत नाहीत. यामध्ये धातूच्या किंवा शब्दाच्या मध्यस्थानी एखाद्या स्वराचे आगमन झालेले दिसते. उदाहरणार्थ रविवार-आईतवार, शुक्रवार-सुकिरवार, नायक-नाईक, इंगळ-इंगोळ इत्यादी. यात मध्यस्थानी एखाद्या स्वराचे आगमन होत असतांना त्याच्या आधी येणाऱ्या व्यंजनाचेही एखाद्या दुसऱ्या व्यंजनात किंवा स्वरात रुपांतर झालेले दिसून येते. उदाहरणार्थ ‘रवि’ चे ‘आईत’, ‘शुक्र’ चे ‘सुकिर’ होतांना दिसते.
- **आद्य व्यंजनागम:** आद्य व्यंजनागमाचा विचार करतांना आपल्याला उकिरडा-वखरडा, उकीर-वकीर, उचकी-गुचकी, उसळ-हुसळ, उतू-वतू, एक-येक, ओटी-वटी, ओघळ-वघळ, ओल-वल, ओढाताण-वडाताण, ओहोळ-वहळ, ओठ-होट, ओसरी-वसरी, ओळख-वळख, ओलसर-वलसर, एकता-येकता, ओकारी-वकारी, एक-येक, एकजीव-येकजीव इत्यादी अनेक उदाहरणे देता येतात. आता हीच उदाहरणे आपण आद्य स्वर लोपात पाहिली आहेत. कारण आद्यस्थानी असलेले एखादे स्वर लोप होते म्हणजे काय तर त्या ठिकाणी एखादे व्यंजन येते. त्यामुळे दोन्ही ठिकाणी उदाहरणे सारखीच आलेली दिसतात.
- **मध्य व्यंजनागम:** यात मध्यस्थानी एखाद्या व्यंजनाचे आगमन झालेले दिसते. कोणत्याही बोलीत साधारणतः जोड शब्दांचे सुलभीकरण करतांना मध्यस्थानी व्यंजनागमाची प्रक्रिया होतांना दिसते. उदाहरणार्थ भक्त-भगत, रक्त-रगत, लग्न-लगन, रड्या-रडक्या, रेल्वे-रेलवे, श्रावण-सरावन इत्यादी. अवघड जोड शब्दांचे सुलभीकरण करून ते बोलीत सर्रासपणे वापरले जातात.
- **अंत्य व्यंजनागम:** यात धातूच्या शेवटी एखादे अतिरिक्त व्यंजन घालून शब्दाची रचना केली जाते. उदाहरणार्थ खाट-खाटला, माठ-माटला, खेत-खेतर, खत-खातर, दोस्त-दोस्तार, आई-आईस, बाप-बाहास, भाऊ-भाऊस, बहीण-बिहीणीस/बहणीस इत्यादी. नातेसंबंधदर्शकशब्दांच्या शेवटी डांगी बोलीत ‘स’ लावण्याची प्रथा आहे.
- **महाप्राणलोप:** बहुतेक बोलीमध्ये महाप्राण लोपाची उदाहरणे दिसून येतात. तसेच डांगी बोलीतही महाप्राण लोपाची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. उदा. अंघोळ-आंगूळ, आधी-आदी, दूध-दूद, गाढव-गाडव, आंधळा-आंदळा, केव्हा-कदवं, तेव्हा-तदवं, हळूहळू-वजंवजं, कधी-कदी, उन्हाळा-उनाळा, आम्ही-आमी, तुम्ही-तुमी, दहा-दस, तहान-तीस इत्यादी. येथे महाप्राणांचा लोप झाल्याने शब्द सुलभता झालेली दिसून येते.
- **महाप्राणागम:** महाप्राण लोपापेक्षा महाप्राणागमाची उदाहरणे तुलनेने कमी दिसतात. तरीही काही उदाहरणे देता येतील. जसे इकडून-येहून, तिकडून-तेहून, दुपार-दुहपार इत्यादी.

७. ९. डांगी बोलीचा शब्दसंग्रह:

कोणत्याही बोलीचा जेव्हा अभ्यास केला जातो तेव्हा त्या बोलीतल्या शब्दांचाही अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. प्रस्तुत ठिकाणीही डांगी बोलीच्या शब्दसंग्रहाचा विचार करण्यात आला आहे. प्रस्तुत ठिकाणच्या शब्दांची मांडणी ही 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण: महाराष्ट्र' आणि 'भारतीय भाषा लोक सर्वेक्षण: गुजरात, दीव-दमन अने दादरा-नगर हवेलीनी भाषा' या गणेश देवी संपादित ग्रंथांच्या आधारे केली आहे. हे करत असतांना मराठीच्या शब्दांना डांगी बोलीतील पर्यायी शब्द कोणकोणते आहेत ते यथायोग्य देण्याचा प्रयत्न केला आहे. यादृष्टीने पाहता काही शब्द मराठीशी तंतोतंत जुळणारे आहेत असे दिसते. तर काही शब्द मराठी शब्दांहून खूपच वेगळे आणि स्वतंत्र आहेत असेही दिसते.

- **नामे:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
बोकड्या	बोकड/बकरा	देडोक	बेडूक
नक्तीर	नक्षत्र	कुवा	विहीर
चांद	चंद्र	धुकटा	धुके
वद	दव	टिवा	थेंब
करुंद	करवंद	जांब	पेरू
कारेला	कारले	पोळस	पळस
जामून	जांभूळ	टोकर	बांबू
खाटला	खाट	डालखी	टोपली
सुपडा	सूप	आबूट	ढग
ईज	वीज	देवधनू	इंद्रधनुष्य

- **सर्वनामे:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
मा	मी	तू	तू
आमी	आम्ही	तुमी	तुम्ही
तिनी	तिची	तेना	त्याचा
तिला	तिला	तेला	त्याला
हो/होयो	हा	तेनी	त्याची
तिना	तिचा	आपले	आपण

तो	तो	ती	ती
कोण	कोण	काय	काय
कदवं	केव्हा	तदवं	तेव्हा
कदी	कधी	कोडाक	किती

- **विशेषणे:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
आंदळा	आंधळा	उचा	उंच
ठग	खोटारडा	बेस	चांगला
जुवान	तरुण	वेट/व्येट	वाईट
गांडा	वेडा	डोसा	वृद्ध
खाटा	आंबट	अळणा	अळणी
ताता	गरम	चिखट	तिखट
वधारे	जास्त	बिहगुड्या	भित्रा
नीट	सरळ	पोका	खूप
ठेंगणा	बुटका	कच्चा	कच्चे
गरीब	शांत	रगेट	रागीट

- **क्रियापदे:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
येना	येणे	जाना	जाणे
घेना	घेणे	देना	देणे
चालना	चालणे	धावना	धावणे
निंगना	निघणे	अनना	आणणे
सोडना	सोडणे	पहना	उजाडले
ग्या	गेला	इसरना	विसरणे
रहना	राहणे	लिहना	घेतले
झोड्ना	मारले	सांगना	सांगितले

- **नातेसंबंध:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
बा/बाहास	वडील	आया	आई
भाऊस	भाऊ	बिहणीस	बहिण
काकास	काका	काकीस	काकी
मामास	मामा	मामीस	मामी
सासरास	सासरा	सासूस	सासू
जवाईस	जावई	वहूस/वूहूस	सून
वहणीस	वहिनी	देरूस	दीर
जेठूस	जेठ	साडूस	साडभाऊ
नंदस	नणंद	घरत्न्या/घरतन्या	घरजावई
सालीस/मेहनीस	साली	सालास/मेहनास	साला
पोसा	मुलगा	पोसी	मुलगी
डवर बाहास	आजोबा	डोसे आईस	आजी

- **काळ/वेळ/दिनचक्रे:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
झुंजुकले	पहाटे	सकाळ	सकाळ
दुहपार	दुपार	येळचन	संध्याकाळ
दीस	दिवस	कालदीस	काल
पाहरा	४ ची वेळ	रात	रात्र
पुनव	पौर्णिमा	वरीस	वर्ष
अवस	अमावस्या	जेथोड	जेष्ठ/पर्जन्यकाळाची सुरुवात
आखाती	अक्षयतृतीया	पोरदीस	मागील वर्षी
औंदं	यावर्षी	पहना	उजाडले
अठवाडे	आठवडा	महना/मिहना	महिना
आज	आज	उद्या	उद्या

- **शरीरावयव:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
डोळा	डोळा	कान	कान
नाक	नाक	वाळ	केस
हात	हात	पाय	पाय
आंगठा	अंगठा	आंगठी	अंगठी
नख	नख	तोंड	तोंड
होट	ओठ	खांदा	खांदा
दात	दात	जीब	जीभ
थाना	स्तन	बेंबी	बेंबी
रगत	रक्त	पोट	पोट
सरीर	शरीर	कमर/कंबर	कंबर

- **अंक:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
येक	एक	दोन/बे	दोन
तीन/त्रन	तीन	चार	चार
पाच	पाच	स	सहा
सात	सात	आठ	आठ
नव	नऊ	दाहा/दस	दहा
ईस	वीस	तीस	तीस
चालीस	चाळीस	पचास	पन्नास
सो	शंभर	दोडसो	दीडशे
पांसो	पाचशे	हजार	हजार

- **शेती:**

डांगी	**मराठी**	**डांगी**	**मराठी**
खेती	शेती	खेतर	शेत

खातर	खत	अउत	नांगर
पाणी	पाऊस	पाणकाळा	पावसाळा
नागली	नाचणी	गहू	गहू
भात	भात	भुयमूग	भुईमूग
तोर	तूर	वरी	वरई
उडीद	उडीद	रोपणी	लावणी
कापणी	कापणी	आदोर	राब
मकी	मका	चना	हरभरा

- **घर:**

डांगी	मराठी	डांगी	मराठी
घर	घर	खपाडा	बांबूची भिंत
खिडकी/बारी	खिडकी	दार/दरवाजा	दरवाजा
बेळ	खांब	पडवी	माजघर
चुला	चूल	फाट्या	सरपण
भानोस	स्वयंपाक	मुस्की	कणगी
इळा/अळस्या	विळा	सरी	सुरी
कुराड	कुऱ्हाड	डालखी	टोपली
सिक्का	शिके	गोदडी	गोधडी
खाटला	खाट	चोपाळा	लाकडी झोका
भोगुनी	पातेली	टगारा	पाटी

- **पशु/पक्षी/कीटक:**

डांगी	मराठी	डांगी	मराठी
हाडग्या	कावळा	खड्या	बिबट्या
हेलगा/दोबड	रेडा	केल्या	माकड
गाय	गाय	बैल	बैल
बकरी	शेळी	बोकड्या	बोकड/बकरा

डुक्कर	डुक्कर	ससा	ससा
कुत्रा	कुत्रा	बिलाडी	मांजर
कोमडी	कोंबडी	कोमडा	कोंबडा
केकडा	खेकडा	कोकिल	झिंगा
पोपोट/पोपट	पोपट	मोर	मोर
तितूर	तितर	बोंगाड्या	भुंगा

उपरोक्त दिलेले शब्द मर्यादित असले तरी त्या शब्दांवरून आपल्याला डांगी बोलीतील शब्दांची चांगली ओळख होईल असे वाटते. डांगी शब्द मराठीच्या किती जवळ आणि किती दूर आहेत हे प्रस्तुत ठिकाणच्या डांगी शब्दांचे अवलोकन केल्यानंतर लक्षात येते. यात 'केल्या, खड्या, हाडग्या, भानोस, अळस्या, खपाडा, पाहरा, येळचन' असे कितीतरी शब्द प्रमाण मराठीपेक्षा वेगळे आहेत असे दिसते.

७. १०. डांगी बोलीची खास वैशिष्ट्ये:

१. डांगी बोलीत 'श, ष, आणि स' च्या जागी फक्त 'स' वापरला जातो. उदा. साळा (शाळा), सिक्सन (शिक्षण), भासा (भाषा), ससा (ससा), सरीर (शरीर), वरीस (वर्ष), सांत (शांत) इत्यादी.

२. डांगी बोलीत नातेसंबंधदर्शक शब्दांना शेवटी 'स' प्रत्यय लावण्याची पद्धती आहे. उदा. आईस (आई), काकास (काका), काकीस (काकी), मामास (मामा), मामीस (मामी), भाऊस (भाऊ), बहणीस (बहीण), साडूस (साडू), सालीस (साली), सासूस (सासू), सासरास (सासरा) इत्यादी. अशा पद्धतीने प्रत्येक नातेसंबंधदर्शक शब्दाच्या शेवटी 'स' प्रत्यय लावून नाते सूचित केले जाते.

३. डांगी बोलीत 'अं' या वर्णाच्या जागी 'आं' हे वर्ण येते. उदा. आंगण (अंगण), आंगठा (अंगठा), आंगठी (अंगठी), आंग (अंग), आंजीर (अंजीर), आंगारा (अंगारा), आंगुळ (अंघोळ) इत्यादी.

४. डांगी बोलीत मराठी भाषेतील 'आहे' व गुजराती भाषेतील 'छे' या क्रियापदांच्या ऐवजी 'आहा' हे क्रियापद येते.

५. डांगी बोलीत मराठी भाषेप्रमाणे 'च्य, च्या, च्ये' असे उच्चार होत नाहीत. जसे मराठीत 'चार' शब्द उच्चारतांना 'च्या' असा ध्वनी मुखातून बाहेर पडतो. डांगी बोलीत मात्र 'चाक' या शब्दातील 'चा' सारखाच उच्चार 'चार' शब्द उच्चारतांना होतो. 'चंचल, चहा, चाकू' या शब्दांतूनही मराठी भाषेत अनुक्रमे 'चें/च्यें, च्या, च्या' असे ध्वनी मुखातून बाहेर पडतात. डांगी बोलीत 'च' चा उच्चार करतांना 'च' ला जोडून 'य' चा उच्चार होत नाही. 'च' चा उच्चार स्पष्टपणे डांगी बोलीत होतो हे डांगी बोलीचे एक वैशिष्ट्ये आहे.

७. ११. समारोप:

आजवर मराठी माणूस ‘डांगी बोली ही मराठीचीच एक बोली आहे.’ असे नेहमी सांगत आला आहे. मात्र या सांगण्यापेक्षा अधिक काही केल्याचे दिसत नाही. त्याप्रमाणात गुजराती अभ्यासकांनी थोडा प्रयत्न केला आहे. मात्र विशेष नोंद घेण्यासारखा प्रयत्न अजूनही कोणी केल्याचे दिसत नाही. प्रस्तुत प्रकरणातून याचा चांगला प्रत्यय येतो.

डांगी बोलीविषयी प्रामुख्याने चर्चा झालेली दिसते ती ग्रिअर्सनपासून. खरे पाहता ग्रिअर्सननेही डांगी बोलीविषयी विशेष, तत्त्वात्मक चर्चा केलेली आहे असे दिसत नाही. मात्र पहिला लिखित प्रयत्न त्यांनीच केला. यादृष्टीने त्यांचे महत्त्व विशेष आहे. त्यानंतर अनेक मराठी, गुजराती अभ्यासकांनी आपापल्या परीने प्रयत्न केलेले आहेत असे दिसते. हल्ली ‘डांगी-कोकणी की भिल्ली’ असा एक नवीनच वाद उद्भवतांना दिसतो. त्यादृष्टीने अनेक अभ्यासकांची स्वतंत्र मते विचारात घेऊन सखोल चर्चा प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे. त्यानंतर भाषा बदलाची कारणे किंवा भाषा संपर्काची कारणे विचारात घेऊन त्यांचीही सखोल चर्चा केलेली आहे. आशा करतो की या सगळ्या प्रश्नांचे निरसन प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून होईल.

*****

संदर्भ:

१. https://dsaluchicagoedu.translate.goog/books/lsi/?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=ajax,nv,sc,elem (दिनांक: ७ सप्टेंबर २०२१)
२. https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/174921(दिनांक: ८ सप्टेंबर २०२१)
३. जोशी वसंत स.-संपा., भाषा व साहित्य: संशोधन-खंड पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद-पुणे, द्वितीयावृत्ती: सप्टेंबर २००६, पृ. ७२
४. तत्रैव, पृ. ८८-८९
५. तत्रैव, पृ. १०५
६. वाढू डाह्याभाई, कुंकणा कथाओ: संकलन अने गुजराती अनुवाद, आदिवासी भाषा साहित्य प्रकल्प, प्रथम संस्करण: २०००, पृ. x
७. पवार पुंडलिक सी., डांगी लोकगीतो: एक स्वाध्याय, आशिष पब्लिकेशन्स-आणंद, प्रथमावृत्ती: २००६, पृ. निवेदन: दोन, १६
८. चौधरी प्रभु आर., दस डांगी लोककथाओ, पार्श्व पब्लिकेशन-अमदावाद, प्रथमावृत्ती: २०१०, पृ. ३५
९. जोशी अरुणा (संपा.), ढोल, मराठी वार्षिकांक; डिसेंबर २००३, भाषा संशोधन-प्रकाशन केंद्र- वडोदरा, पृ. ४५
१०. तत्रैव, पृ. ४४
११. https://censusindia.gov.in/2011census/dchb/DCHB_A/24/2422_PART_A_DCHB_THE%20DANGS.pdf (दिनांक: ९ सप्टेंबर २०२१, पृ. ६२)
१२. गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल: ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, (पुस्तकात आवृत्तीचा उल्लेख नाही), पृ. १
१३. गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, तृतीयावृत्ती: २०१२, पृ. ४४
१४. देवी गणेश- संपा., भारतीय भाषा लोक सर्वेक्षण: गुजरात, दीव-दमण अने दादरा-नगर हवेलीनी भाषा, ग्रंथ ९ भाग ३, ओरिएन्ट ब्लैकस्वॉन प्राईवेट लिमिटेड-नवी दिल्ली, प्रथम संस्करण २०१६, पृ. ४७५
१५. जाखडे अरुण-संपा., भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण: महाराष्ट्र, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: १७ ऑगस्ट २०१३, पृ. ७०
१६. तत्रैव, पृ. ७०
१७. https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/59517 (दिनांक: २० सप्टेंबर २०२१)
१८. मांडे प्रभाकर, आदिवासींचे धर्मांतर: एक समस्या, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, प्रथमावृत्ती: २००३, पृ. १
१९. तत्रैव, पृ. १४

२०. **https://cdn.s3waas.gov.in/s3d7a728a67d909e714c0774e22cb806f2/uploads/2018/06/2018062982.pdf**(दिनांक: २०/०९/२०२१)

२१. भागवत दुर्गा आणि खानापूरकर द. पु., डांगच्या लोककथा-भाग १, वरदा बुक्स-पुणे, प्रथमावृत्ती: १ ऑगस्ट १९९२, पृ. प्रस्तावना दोन